दैनिक
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ६ वे अंक -१९ | गुरूवार, दि.२५ सप्टेंबर २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रू | पाने ४

Beed | Daily Marathi | Year-6th | Issue-19 | Thursday, Dt.25 September 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

## बीड जिल्ह्यातील नुकसानग्रस्त शेतपिकांची पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंढे यांनी केली पाहणी

बीड /प्रतिनिधी

बीड जिल्ह्यामध्ये ढगफुटी सदृश्य पाऊस झाल्याने सिंदफणा नदीला पूर आल्याने या नदीचे पाणी बऱ्याच शेतामध्ये घुसल्याने शेतपिकांचे बरेच नुकसान झाले. या पार्श्वभूमीवर राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री श्रीमती पंकजा मुंडे यांनी आज गेवाराई तालूक्यातील धोंडराई आणि हिरापूर येथील पूराने नुकसान झालेल्या शेतपिकाची पाहणी केली.




यावेळी श्रीमती. मुंडे यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधुन, बाधीत शेतकऱ्यांना तात्काळ मदत करणार असल्याचे आश्वासित करुन नुकसानग्रस्त भागाचे पंचनामे करण्याचे काम सुरु आहे. शासनामार्फत पुरग्रस्त भागातील बाधीत नागरिक आणि शेतकऱ्यांना तात्काळ मदत पोहोचविण्याचे काम सुरू आहे. शासन नागरिकाच्या पाठीशी उभे असुन कोणीही काळजी करू नये. नुकसानग्रस्त शेतकरी आणि नागरिकांना शासन लवकरात लवकर मदत करणार आहे असे आश्वासित केले.

शेतपिकांच्या झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून त्यांना मदत देण्यात येणार आहे. जिल्ह्यातील ज्या भागात ६५ मिमी पेक्षा जास्त पाऊस झाल्यास अतिवृष्टी घोषित करण्याचा नियम आहे परंतु ६५ मिमी पेक्षा कमी पाऊस झाला असेल त्या ठिकाणचेही पंचनामे करण्याच्या सूचना ही श्रीमती पंकजा मुंडे यांनी यावेळी प्रशासनाला यावेळी दिल्या.यावेळी आमदार विजयसिंह पंडित, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन उपविभागीय अधिकारी कविता जाधव, तहसिलदार चंद्रकांत शेळके, मंडळ अधिकारी, तलाठी यांच्यासह धोंडराई आणि हिरापूर येथील गावकऱ्यांची उपस्थिती होती.




## रा.काँ.पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आ.शशिकांत शिंदेंनी बीडसह तालुक्यात केली अतिवृष्टीची पाहणी

### शासनाने ओला दुष्काळ जाहीर करून सरसकट नुकसान भरपाई देण्याची मागणी

बीड (प्रतिनिधी) राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आ.शशिकांत शिंदे यांनी बीडसह तालुक्यात अतिवृष्टी झालेल्या भागाचा दौरा करत नुकसानीची पाहणी केली.

बीड जिल्ह्यासह तालुक्यात मागील चार दिवसांपासून जोरदार पाऊस झाला आहे. अनेक महसूल मंडळात अतिवृष्टी झाल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. या अतिवृष्टी झालेल्या ठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आ.शशिकांत यांनी पाहणी केली. यावेळी त्यांनी शासनाकडे बीड जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाईची देण्याची मागणी केली.

बुधवार (दि.२४) रोजी बीड मतदारसंघातील पिंपळवाडी, बेलखंडी पाटोदा, नागझरी, मानेचावाडा, कचारवाडी, दत्तनगर (बे.पाटोदा),

(उर्वरीत पान २ वर)

## धनगर समाजाचा जालन्यात महाएल्गार

### आरक्षणासाठी लाखोंच्या संख्येने धनगरांचा जनसागर उसळला !

जालना /प्रतिनिधी

धनगर समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षण मिळावे, या मुख्य मागणीसाठी जालना शहरात बुधवारी दि.२४ सप्टेंबर २०२४ ऐतिहासिक मोर्चाचे आयोजन करण्यात आले. दिपक बोऱ्हाडे यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या उपोषणाला जिल्हाभरातून प्रचंड जनसमर्थन मिळत असून या मोर्चामध्ये अक्षरशः जनसागर उसळला.



सकाळी १० वाजेपासूनच जिल्हाभरातून धनगर समाजाचे जत्थे वाजत-गाजत, घोषणाबाजी करत जालना शहरात दाखल होऊ लागले. दुपारी १ वाजेपर्यंत शहरात चारही दिशांनी आंदोलकांचा महापूर उसळून आला. मंठा रोड,अंबड रोड, छत्रपती संभाजीनगर रोड, जळगाव राजा रोड या प्रमुख मार्गावरून येणाऱ्या हजारो कार्यकर्त्यांच्या आम्हाला आमचा हक्क द्या,धनगर समाजाला एसटी आरक्षण द्या अशा घोषणांनी संपूर्ण शहर दणाणून गेले.मोर्चामध्ये महिला आणि पुरुष कार्यकर्त्यांची प्रचंड गर्दी पाहायला मिळाली.काही ठिकाणी पारंपरिक वाद्यांच्या गजरात समाजाचे जथे पुढे सरकत होते.तर युवकांकडून आक्रमक घोषणाबाजी होत होती.जालना शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा आणि गांधी चव्हाण चौक परिसरात समाजबांधवांची प्रचंड गर्दी उसळली होती.या ठिकाणाहून मोर्चा अंबड चौफुली येथील उपोषण स्थळाकडे निघाला. उपोषणकर्त्यांना ऐतिहासिक पाठिंबा दर्शवत हजारो आंदोलक एकदिलाने समाजाच्या हक्काची मागणी करत असल्याचे चित्र या वेळी पाहायला मिळाले.

जालन्यातील या अभूतपूर्व मोर्चामुळे धनगर समाजाच्या मागणीला ऐतिहासिक बळ मिळाले असून प्रशासन आणि सरकारसमोर या आंदोलनाचा तोडगा काढण्याचे मोठे आव्हान उभे ठाकले आहे.

## एकही शेतकरी शासनाच्या मदतीपासून वंचित राहणार नाही – कृषिमंत्री दत्तात्रय भरणे

### काळजी करू नका, शासन आपल्या सोबत

छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी

जालना जिल्ह्यात अतिवृष्टीने शेतीचे नुकसान झाले आहे, अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानग्रस्त भागातील शेतीशिवाराची आज कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी पाहणी केली व सोमठाणा, ता.बदनापूर, ढाकलगाव, ता.अंबड या गाव शिवारातील शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन काळजी करू नका, शासन आपल्या सोबत आहे असा धीर दिला. एकही शेतकरी शासनाच्या मदतीपासून वंचित राहणार नाही असे सांगतानाच तात्काळ पंचनामे करून शासनाला अहवाल सादर करा, असे निर्देश त्यांनी जिल्हा प्रशासनाला दिले.



जालना जिल्ह्यातील सोमठाणा, ता.बदनापूर शिवारात आज सकाळी कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी थेट बांधावर जात शेतकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी आमदार नारायण कुचे यांच्यासह महसूल, कृषि, पशुसंवर्धन, कृषि विद्यापीठ यांच्यासह संबंधित यंत्रणांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

कृषिमंत्री श्री.भरणे संवाद साधताना म्हणाले, अतिवृष्टीमुळे शेतकरी बांधवाने कष्टाने पिकविलेल्या शेती पिकाचे नुकसान झाले आहे. जालना जिल्ह्यात नुकसानीचे क्षेत्र अधिक आहे. कपाशी, सोयाबीन यासह इतर पिकांचे नुकसान मोठ्या प्रमाणात आहे. जिल्हा प्रशासनाने संबंधित यंत्रणांसह तातडीने पंचनामे करून राज्य शासनाकडे अहवाल सादर करावा. अहवाल प्राप्त होताच तातडीने नुकसान भरपाई देण्यात येईल. एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही, काळजी करू नका, शासन आपल्या सोबत आहे, असा धीर त्यांनी शेतकऱ्यांना दिला. कृषिमंत्री म्हणून आपण सर्व शेतकरी बांधवांच्या पाठीशी ठामपणे उभे आहोत. तसेच शासनाची भूमिका शेतकऱ्याला आधार देण्याचीच असून नुकसानीचे पंचनामे होऊन प्रस्ताव सादर होताच मदत तत्परतेने मदत मिळेल, संकटाच्या काळात आपण सर्व शेतकरी बांधवांच्या पाठीशी उभे राहूयात असेही ते म्हणाले.यावेळी शासनाच्या विविध विभागांचे प्रमुख, लोकप्रतिनिधी, शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## माजी मंत्री प्रा. सुरेश नवले यांनी प्रत्यक्ष बांधावर जाऊन केली नुकसानीची पाहणी

बीड /प्रतिनिधी

आज माजी मंत्री प्रा. सुरेश नवले यांनी अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या उमरद जहांगीर, पारगाव शिरस, सोनगाव, साक्षर पिंपरी, पौंडूळ, खांबा, लिंबा, खलापुरी, जांब, आर्वी, तरडगव्हाण, गाजीपुर, हाजीपुर गावासह इतरही गावांची प्रत्यक्ष बांधावर जाऊन पाहणी केली असता अतोनात नुकसान झाल्याचे पाहून वेदना झाल्याचे सांगितले.



बीड जिल्ह्यात एकूण ११ तालुके असून शासन निर्णयामध्ये बाधित शेतकऱ्यांची संख्या ११४७७३ म्हणजे सरासरी एका तालुक्यात फक्त आणि फक्त १०००० शेतकरीच या अतिवृष्टीमध्ये बाधित झालेले दिसून येत असून संपूर्ण जिल्ह्यासाठी फक्त ५६.७३ कोटी तुटपुंजा निधी मंजूर केला आहे तो जिल्ह्यातील लाखो नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसल्याप्रमाणे आहे.

परंतु सत्य परिस्थिती अशी नाही याबाबत महसूल विभागाने त्यांच्या यंत्रणेमार्फत बीड जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये पावसाने रुद्रावतार धारण केलेले असून जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील छोटे मोठे नदी नाले आणि प्रमुख नद्यांनी पात्र सोडल्यामुळे शेकडो

(उर्वरीत पान २ वर)

## कंकालेश्वर मंदिराच्या जतन, दुरुस्ती कामासाठी ९ कोटी १४ लक्ष निधीस प्रशासकीय मान्यता

### उपमुख्यमंत्री अजित पवार यांची माहिती

मुंबई /प्रतिनिधी

कंकालेश्वर मंदिर, ता.जि.बीड या राज्य संरक्षित स्मारकाच्या जतन, दुरुस्ती कामासाठी येणाऱ्या ९,१४,५४,४०३/- (रु.नऊ कोटी चौदा लक्ष चौपण्ण हजार चारशे तीन मात्र) इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी दिली.




या संदर्भातील शासन निर्णय सांस्कृतिक व पर्यटन पर्यटन विभागाने आज जारी केला आहे.संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय यांना यासाठी नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे.कंकालेश्वर मंदिर हे बीड शहरातील एक प्राचीन आणि भव्य शिवमंदिर आहे.वास्तुशैलीवरून ते १० व्या ते १२व्या शतकादरम्यान (सुमारे १००० वर्षे जुने) बांधले गेले असावे असे मानले जाते.ते बीडच्या ऐतिहासिक वारशाचे एक प्रमुख प्रतीक मानले जाते आणि पर्यटकांसह भक्तांसाठी आकर्षणाचे केंद्र आहे. मंदिराची वास्तुकला, स्थान आणि धार्मिक महत्त्व यामुळे ते विशेष ओळखले जाते.मंदिराच्या बाह्यभागावरील शिल्पकला ही मराठवाड्यातील प्राचीन

(उर्वरीत पान २ वर)

## पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांचा जालना दौरा

### अतिवृष्टीग्रस्त शेतकरी व पूरग्रस्त कुटुंबांना सरकारची मदत नक्की मिळेल– पंकजाताई मुंडे

जालना /प्रतिनिधी

जिल्ह्याच्या पालकमंत्री आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी बुधवारी दि.२४ जालना जिल्ह्यातील अतिवृष्टीग्रस्त भागांचा दौरा करून शेतकऱ्यांची आणि पूरग्रस्त कुटुंबांची प्रत्यक्ष भेट घेतली. परतूर, घनसावंगी आणि अंबड तालुक्यातील शेतांमध्ये जाऊन त्यांनी नुकसानीची पाहणी केली.तसेच अंबड तालुक्यातील सुखापुरी व लखमापुरी या गावांतील पूरग्रस्त कुटुंबांना दिलासा देत शासनाकडून सर्वतोपरी मदत दिली जाईल अशी ग्वाही दिली.

पालकमंत्र्यांनी परतूर तालुक्यातील गोळेगाव येथील शेतांची पाहणी करून दौऱ्याची सुरुवात केली.त्यानंतर घनसावंगी व अंबड तालुक्यातील



बाधित शेतकऱ्यांच्या शिवारात जाऊन त्यांनी सोयाबीन,मका, कापूस यांसारख्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर झालेले नुकसान पाहिले.अचानक झालेल्या ढगफुटीसदृश पावसाने काढणीला आलेल्या पिकांचे नुकसान झाल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत.

शेतकऱ्यांच्या व्यथा ऐकून घेत पालकमंत्री मुंडे म्हणाल्या प्रत्येक बाधित शेतकऱ्याला तातडीने मदत मिळवून दिली जाईल. पंचनामे जलदगतीने पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. सरकार तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे.

अतिवृष्टीमुळे सुखापुरी धरण ओव्हरफ्लो झाले आणि नदीकाठच्या

(उर्वरीत पान २ वर)

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

## संपादकीय

महाराष्ट्रात महाप्रलय

महाराष्ट्रावर महाप्रलयाचं संकट आलं आहे. नेहमीपेक्षा थोडा लवकरच सुरू झालेला पाऊस नवरात्रीतही आषाढासारखा कोसळतो आहे. अहिल्यानगरच्या दक्षिण भागापासून मराठवाड्याला कवेत घेत या पावसाने अर्ध्या विदर्भालाही अक्षरशः झोडपून काढलं आहे. सोलापूर आणि जळगाव जिल्ह्याचा काही भागही या पावसाच्या तडाख्यात सापडला आहे. जेमतेम पर्जन्यमानाच्या या प्रदेशाला कोकणापेक्षा अधिक मुसळधार पाऊस सोसणं कठीण आहे. पावसाच्या दीर्घकाळ आणि काही ठिकाणी ढगफुटीसारख्या कोसळण्याने या भागातील जनजीवन पूर्ण उद्ध्वस्त झालं आहे. विशेषतः शेतीचं झालेलं नुकसान अपरिमित आहे. महाराष्ट्राला मे महिन्यापासून पावसाचे चातकापेक्षाही जास्त वेध लागतात. अनेक ठिकाणी पाणीटंचाई जाणवू लागते. टँकरने होणारा पाणीपुरवठाही अपुरा पडू लागतो. माणसांना स्वतःच्या गरजा आणि पाळीव जनावरांच्या पाण्याच्या गरजा कशा भागवायच्या असा प्रश्न सतावत असतो. त्यामुळे, एकदा पाऊस सुरू झाला, की निम्मा महाराष्ट्र सुटकेचा निःश्वास टाकत असतो. राज्याचा त्यापेक्षा अधिक भाग पावसाने धरणं भरावी, तळी-विहिरी भराव्यात एवढीच माफक अपेक्षा ठेवून असतो. यावर्षी अनेक ठिकाणी ऑगस्ट महिन्याच्या सुरुवातीलाच पाणी चांगलं भरलं. जलाशय तुडुंब झाल्याने ग्रामीण भागात समाधान पसरलं. लोक उत्साहात होते. पण, ऑगस्टच्या शेवटापासून पावसाने आणखी जोर धरला तेव्हाच निम्म्या महाराष्ट्राचे धाबे दणाणले. नंतरच्या पावसाने शेतीचं, फळबागांचं नुकसान सुरू केलं. मराठवाड्यात आणि उत्तर महाराष्ट्रातील जळगाव जिल्ह्यात याच काळात ढगफुटीसदृश पाऊस झाला.

परतीचा पाऊस जाता जाता दोन-चार ठिकाणी तडाखा देत असतोच. तसा इतिहास आहे. त्यामुळे, ऑगस्ट महिन्याच्या अखेरीला झालेलं नुकसान तिथेच थांबेल, अशी अटकळ होती. पण, प्रत्यक्षात पावसाचा जोर आणखी वाढला. सप्टेंबरचा दुसरा पंधरवडा उलटूनही पावसाचा जोर कमी होत नाही, हे लक्षात आलं, तेव्हाच जाणकारांना या वर्षीच्या महाराष्ट्रावरच्या संकटाची चाहूल लागली. अहिल्यानगरच्या दक्षिण भागातल्या दुष्काळी पट्ट्यातही असा पाऊस झाला, की गावंच्या गावं पुराने वेढली गेली. चारचाकी गाड्या वाहून जातील, एवढ्या वेगाने पाण्याचे प्रवाह ऐन गावांतून वाहत होते. गेल्या दोन दिवसांत पावसाचा हाच जोर सर्वदूर पसरला आहे. महाराष्ट्राचे अनेक जिल्हे आणि त्यातील अनेक तालुके अक्षरशः पाण्यात बुडाले आहेत.

महाराष्ट्रात यापूर्वीही पूर आले, महापूर आले. पण, अनेक जिल्ह्यांत एकाचवेळी रबरी बोटी आणि लष्कराच्या हेलिकॉप्टरच्या मदतीने ग्रामस्थांची, नागरिकांची सुटका करण्याची वेळ आली नव्हती. ती यावेळी आली आहे. या महाप्रलयाला 'महा' का म्हटलं, ते यावरून लक्षात येईल. या पावसाळ्यात हिमालयात अनेक ठिकाणी ढगफुटी झाल्या. पर्वताचे मोठे भाग ढासळले. गावंच्या गावं वाहून गेली. पंजाबातही ३० जणांचा बळी घेऊन पावसाने आपला रुद्रावतार दाखवला. पण, महाराष्ट्रात पठारी भागात पावसाने सातत्याने आपलं तांडव चालवलं असल्याने या भागातल्या उभ्या पिकांचं, फळबागांचं, शेतजमिनींचं, गाईगुरांचं आणि लोकांच्या निवाऱ्यांचं मोठं नुकसान झालं आहे. पावसाने गावंच्या गावं

# जाफराबाद मध्ये एटीएम फोडून तब्बल
# २१ लाख ४० हजार रुपयांची रोकड लंपास

जाफ्राबाद /प्रतिनिधी

जाफ्राबाद तालुक्यातील जाफ्राबाद गावात अज्ञात चोरट्यांनी एटीएम मशीन फोडून तब्बल २१,४०,०००/- रुपयांची रोकड लंपास केल्याची सनसनाटी घटना समोर आली आहे. शनिवारी रात्री उशिरा ते रविवारी पहाटेच्या दरम्यान ही घटना घडली असून यामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

घटनेचा सविस्तर तपशील मौजे जाफ्राबाद येथील माहोरा रोडवरील पाण्याच्या टाकीजवळ हबीब अब्दुला हबीब ताहेर यांच्या मालकीच्या शेटरमध्ये एटीएम बसविण्यात आले होते. याच एटीएमवर चोरट्यांनी मोठी चोरी केली. सुरुवातीला चोरट्यांनी सीसीटीव्ही कॅमेऱ्यावर काळा स्प्रे मारून त्याला निष्क्रिय केले. त्यानंतर गॅस कटरच्या सहाय्याने एटीएम मशीन कापून त्यातील रोकड व कैसेट काढून नेण्यात आले.

या प्रकारात एटीएम मशीन व कॅमेऱ्यांचे अंदाजे ३ लाखांचे नुकसान झाले असून, त्यातील एकूण २१,४०,०००/- रुपयांचा मुद्देमाल चोरट्यांनी चोरून नेला आहे. रोकडमध्ये ५०० रुपयांच्या ४,१४२नोटा आणि १०० रुपयांच्या ६९०नोटांचा समावेश होता.

पोलिसांची धावपळ

घटनेची माहिती मिळताच एसडीपीओ डॉ. नीतीन कटेकर, पोलीस निरीक्षक जाधव सो तसेच इतर अधिकारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. पोलीस ठाणे जाफ्राबाद येथे फिर्यादी निलेश माणिकराव गावंडे (वय ४४, व्यवसाय: मॅनेजर, फायनान्शियल सॉफ्टवेअर अँड सिस्टिम प्रा.लि. मुंबई, रा. अकोला) यांच्या तक्रारीवरून अज्ञात आरोपींविरुद्ध भादंवि कलम ३३१(४), ३०५, ३२४(५), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सध्या पुढील तपास पोलीस निरीक्षक जाधव सो यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण

गावाच्या मध्यवर्ती ठिकाणी झालेल्या या धाडसी चोरीमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. एटीएम सुरक्षेतील त्रुटींवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून या घटनेमुळे परिसरातील व्यापारी व सर्वसामान्यांमध्ये असुरक्षिततेची भावना पसरली आहे.



पुढील तपास सुरू

पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून आसपासच्या सीसीटीव्ही फुटेजचा तपास सुरू केला आहे. चोरीतील गुन्हेगार कोण आहेत, ते कुठून आले आणि चोरीनंतर कुठल्या दिशेला पळाले याबाबत पोलीस वेगवेगळ्या तपासाच्या धाग्यांवर काम करत आहेत.

गेल्या काही दिवसांत जिल्ह्यात चोरी व दरोड्यांच्या घटना वाढल्या असून पोलिसांसमोर चोरट्यांचा माग काढण्याचे मोठे आव्हान निर्माण झाले आहे.

# शेतकऱ्याचा अंत पाहू नका जगाचा पोशिंदा जगला पाहिजे - अजय बनकर



जाफराबाद /हरी भालके

जाफराबाद दि.२५ गत काही दिवसांपासून झालेल्या अतिवृष्टीमुळे व पूरस्थितीमुळे राज्यातील शेतकरी बांधवांवर अभूतपूर्व संकट कोसळले आहे. पिकांची झालेली प्रचंड हानी, शिवारातील उभ्या पिकांचे चिखलात झालेले रूपांतर, आणि शेतीचे झालेले प्रचंड नुकसान यामुळे शेतकरी कुटुंब हवादील हताश झाले आहे. शेतकऱ्यांच्या डोळ्यांपुढे कष्टाचे स्वप्न उद्ध्वस्त झाले असून, उपजीविकेचे साधन संपुष्टात आले आहे.

अशा परिस्थितीत सरकारने पंचनाम्याच्या नावाखाली वेळकाढूपणा करून शेतकऱ्यांची अधिक फसवणूक करू नये. शेतकऱ्यांना खरोखरच दिलासा मिळावा यासाठी तात्काळ ठोस निर्णय घेणे आवश्यक आहे. पिकांचे नुकसान भरपाई स्वरूपात सरसकट मदत रुपये ५०,००० प्रति एकर देण्याचा निर्णय सरकारने आजच जाहीर करावा, हीच सर्व शेतकऱ्यांची अपेक्षा आहे.

पून्हा एकदा शेतकरी संकटात सापडला आहे. शेतकरी हा देशाचा कणा आहे. जर कणा मोडला तर समाज वाचणार नाही. म्हणूनच या बिकट परिस्थितीत शेतकरी बांधवांना तातडीने न्याय द्यावा.अशी मागणी अजय पाटील बनकर जाफराबाद काँग्रेस तालुका अध्यक्ष यांनी केली.

# उध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडू नका
## अन्यथा राष्ट्रवादी काँग्रेस बीडमध्ये मोर्चा काढणार - आ. शशिकांत शिंदे





बीड /प्रतिनिधी

अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. हाता तोंडाशी आलेला घास निसर्गाने हिसकावला. घरदार, पिकासह शेत जमीन वाहून गेली. पशुधनाचे नुकसान झाले. संपूर्ण खरीप गेलं रब्बीची शाश्वती राहिली नाही. कर्जात अडकलेल्या शेतकऱ्यांचे संसार उध्वस्त झाले. भयावह परिस्थिती असताना काल शासनाने जाहीर केलेली तुटपुंजी मदत शेतकऱ्यांचे आर्थिक संकट सावरू शकत नाही. सरसकट पंचनामे करण्याचे आदेश देणे आवश्यक असताना परिस्थिती पाहून पंचनामे करा असे आदेश शासनाने दिले आहेत. ही संकष्टग्रस्त शेतकऱ्यांची फसवणूक आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना समाधानकारक सरकारची मदत मिळाली नाही तर बीडमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस सरकारच्या विरोधात भव्य मोर्चा काढून सरकारला जागे करेल असा थेट इशारा राष्ट्रवादीचे आमदार शशिकांत शिंदे यांनी दिला आहे.

शासनाने दिलदार मनाने ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना भरभरून मदत करावी. अन्यथा सर्वसामान्य शेतकरी उठाव करेल. नाशिक प्रमाणे बीडमध्ये सुद्धा शरदचंद्र पवार साहेब यांच्या उपस्थितीत महामोर्चा काढून जाब विचारला जाईल.असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आ. शशिकांत शिंदे यांनी दिला आहे.राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश अध्यक्ष आ. शशिकांत शिंदे यांनी बीड जिल्ह्यातील नुकसानीची पाहणी करून बाधित शेतकऱ्यांना दिलासा दिला.यावेळी त्यांच्यासमवेत खा. बजरंग बप्पा सोनवणे, आ. संदीप भैय्या क्षीरसागर, जिल्हाध्यक्ष राजेंद्रजी मस्के, माजी आमदार सलीम भाई, मेहबूब शेख ,उषाताई दराडे, संगिता ताई ठोंबरे,सुशीलाताई मोराळे, अँड हेमाताई पिंपळे शिवराज बांगर ,आदी सह प्रमुख पदाधिकारी सकाळपासून या दौऱ्यात सहभागी होते. पिंपळवाडी, दत्तनगर, बेलखंडी, नागझरी, शिरापूर गात, निमंगाव चांदेवली ब्रम्हनाथ येळंब, शिरूर का. येथील व्यापारी व आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांची संवाद साधून त्यांच्या अडचणी व समस्या जाणून घेतल्या.पिंपळवाडी ता बीड येथील पूरग्रस्त पीडित मयत आदित्य कळसाने यांच्या कुटुंबांची व मयत अक्षय जाधव यांच्या कुटुंबाची भेट घेऊन सांत्वन केले.बीड जिल्ह्यात पूर परिस्थितीमुळे ज्यांचे संसार वाहून गेले अशा कुटुंबांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने लवकरच संसार उपयोगी वस्तू आणि सामग्रीचे वितरण करण्यात येणार आहे.अशी माहिती जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी दिली आहे.

पान १ वरून...

**रा.काँ.पक्षाचे प्रदेशाध्यक्ष...**

शिरापूर गात, शिरूर तालुक्यातील निमगाव, नांदेवली परिसरात सिंधफणा नदीला आलेल्या पुरामुळे शेतकऱ्यांचे शेत, पिके, घरे व जनजीवन मोठ्या प्रमाणात उध्वस्त झाले आहे. याठिकाणी अनेकांचे संसार पाण्यात वाहून गेले आहे. अशा गंभीर परिस्थितीची राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आ.शशिकांत शिंदे यांनी पाहणी केली. तसेच अनेक भागात पूरग्रस्त भागांत जाऊन नुकसानीची पाहणी करत घरांचे झालेले नुकसान, पाण्याने वाहून गेलेले साहित्य यासंदर्भात माहिती घेतली. संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांशी आणि नागरिकांशी संवाद साधत त्यांना धीर दिला व शासनाच्या वतीने मदतीलबून देण्यासाठी प्रयत्न करण्याचा शब्द दिला. या पाहणी दरम्यान बीड जिल्ह्याचे खासदार मा. बजरंग बप्पा सोनवणे, रा.काँ. पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, बीड मतदार संघाचे आ.संदीप क्षीरसागर सोबत होते.

**माजी मंत्री प्रा. सुरेश....**

एकर जमीन पूर्णपणे खरडून गेल्याने असंख्य शेतकऱ्याकडे जमीनच शिल्लक राहिली नाही ज्यांची जमीन पूर्ण खरडून गेली सकस माती राहिली नाही मातीचा पोतही बदलला पूर्ण पाण्याने वाहून गेली याबाबत शासनाची नेमकी भूमिका काय आहे हा महत्त्वाचा मुद्दा आहे. यासोबतच शेतमालाचे, शेती अवजाराचे, घराचे, छोट्या मोठ्या व्यावसायिकांचे, निराधार /गोरगरीबांच्या घराचे, पाळीव प्राण्याचे, पाळीव पक्षाचे आणि सार्वजनिक मालमत्तेचे अतोनात नुकसान झाले आहे. याबाबत सत्य परिस्थितीवर आधारित पहाणी करून बीड जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांना, व्यापाऱ्यांना योग्य तो नुकसानीचा मोबदला देण्यासाठी पुनर्विचार करून सुधारित शासन निर्णय निर्गमित करून सबंध जिल्हावाशियांना शासनाने न्याय द्यावा अशी मागणी करून याबाबत शासनाकडे पाठपुरावा करणार असल्याचे माजी मंत्री प्रा. सुरेश नवले यांनी प्रतिनिधींशी बोलताना सांगितले. यावेळी शेकडो कार्यकर्त्यांसह प्रत्येक गावातील व्यवसायिक, शेतकरी, महिला, अबाल वृद्ध मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**कंकालेश्वर मंदिराच्या जतन, ...**

वास्तुकलेचे उत्तम उदाहरण आहे. महाशिवरात्री आणि श्रावण महिन्यात या मंदिरात हजारो भाविक दर्शनासाठी येत असतात. मंदिराचे हे महत्त्व लक्षात घेऊन त्याचे जतन आणि संवर्धन करण्याची मागणी अनेक दिवसांपासून लोकप्रतिनिधी आणि सामाजिक संघटनांकडून होत होती. त्याची दखल घेऊन उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या पुढाकाराने हा विषय अखेर मार्गी लागला असून आज त्या संदर्भातील शासन निर्णय जारी झाला आहे.

**पालकमंत्री पंकजाताई....**

सुखापुरी व लखमापुरी गावांमध्ये पाणी घुसले. अनेक कुटुंबांच्या घरातील धान्य, वस्तू, संसारोपयोगी साहित्य वाहून गेले.या कुटुंबांना भेटून पालकमंत्री मुंडे यांनी थेट संवाद साधला त्यांची व्यथा जाणून घेतली आणि त्यांचे सांत्वन केले. त्यांनी आश्वासन दिले की या संकटकाळात कोणीही धीर सोडू नये. शासनाकडून सर्व आवश्यक मदत दिली जाईल.

नुकसानीचे पंचनामे करून शेतकरी व बाधित कुटुंबांना त्वरित मदत पोहोचवण्याचे आदेश पालकमंत्र्यांनी प्रशासनाला दिले. शेतकऱ्यांची अडचण ही सरकारची प्राथमिक जबाबदारी आहे, विलंब न करता मदत केली जावी असे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले.या दौऱ्यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी हिकमतदाद उढाण, पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता देशमुख,उपविभागीय अधिकारी उमाकांत पारधी, अंबड तहसीलदार विजय चव्हाण,घनसावंगी तहसीलदार पूजा वंजारी,गटविकास अधिकारी कवडदेवी आदी अधिकारी उपस्थित होते.मोठ्या संख्येने कार्यकर्ते,शेतकरी व गावकरीही उपस्थित राहून आपल्या समस्या मांडल्या.

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-४२० दि.०३.०९.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान अयान फेरोज मोमीन रा.जामखेड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**त्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अयान फेरोज मोमीन | स्वतः | १५.०८.२००४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ०३/ ०९ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-४२० दि.०३.०९.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान अरशद आरीफ शेख रा.जामखेड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**त्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अरशद आरिफ शेख | स्वतः | १५.०६.२००४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ०१/ ०९ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री.एच. एम. मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ७०९/२०२५**
**सागरबाई व इतर वि. निरंक**
**(मार्फत-ॲड. एम. वाय. इनामदार, गेवराई)**

ज्याअर्थी मयत शेषेराव पि. वामन कापसे रा. धोंडराई ता. गेवराई जि. बीड हे दिनांक २९/०३/२०२१ रोजी धोंडराई ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार क्र. १ सागरबाई भ्र. शेषेराव कापसे, वय ६५ वर्षे, धंदा- शेती रा. धोंडराई ता. गेवराई जि. बीड अर्जदार क. २ बप्पासाहेब पि शेषेराव कापसे, वय ४४ वर्षे, धंदा- शेती रा. धोंडराई ता. गेवराई जि. बीड, अर्जदार क. ३ अर्चना भ्र. अंकुश भिसे, वय ३० वर्षे, धंदा- शेती रा. बंगालीपिंपळा ता. गेवराई जि. बीड यांनी शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत शेषेराव पि. वामन कापसे रा. धोंडराई ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक२५/०८/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख:- ०३/१०/२०२५

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

---

## मुखेड नगर परिषद, मुखेड
**नवीन प्रशासकीय इमारत, मुखेड, जि. नांदेड**
**जा.क्र. /२०२५ दि.२६.०८.२०२५**

### जाहीर प्रगटन

या जाहीर प्रगटनाधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की. श्री/श्रीमती **साईनाथ विठ्ठल उल्लेवाड** यांनी प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत बांधकाम परवानगी मिळण्याकरिता या कार्यालयात त्यांचे अर्ज सादर केला असून त्यांनी सादर केलेल्या माहितीच्या आधारे त्यांच्या जागेचे वर्णन खालील परिशिष्ट मध्ये नमूद केलेले आहे.

**परिशिष्ट**
सर्वे नं. (०) वार्ड क्र. (०८)
भूखंड मालमत्ता क्र.**२७१**

पूर्व : **रस्ता**
पश्चिम : **गिरजाबाई रामचंद्र यांची जागा**
दक्षिण : **अनिल विठ्ठल उल्लेवाड**
उत्तर : **गंगाबाई मंगनाळे**

तरी उपरोक्त बाबतीत/यासबंधी कसल्याही प्रकारचा कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसाचे आत लेखी आक्षेप अर्ज पुराव्यासहित या कार्यालयात सादर करावा. उक्त विहित मुदतीत लेखी आक्षेप सादर न केल्यास त्याचा विचार केला जाणार नाही तसेच प्रस्तुत प्रकरणी कोणालाही कसल्याही प्रकारचा आक्षेप नसल्याचे समजण्यात येईल व पुढील कार्यवाही करणेत येईल याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित/-**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद मुखेड**

---

## मुखेड नगर परिषद, मुखेड
**नवीन प्रशासकीय इमारत, मुखेड, जि. नांदेड**
**जा.क्र.३४२१/२०२५ दि.११.०९.२०२५**

### जाहीर प्रगटन

या जाहीर प्रगटनाधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की. श्री/श्रीमती **शेख लियाकतअली मौलाना** यांनी प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत बांधकाम परवानगी मिळण्याकरिता या कार्यालयात त्यांचे अर्ज सादर केला असून त्यांनी सादर केलेल्या माहितीच्या आधारे त्यांच्या जागेचे वर्णन खालील परिशिष्ट मध्ये नमूद केलेले आहे.

**परिशिष्ट**
सर्वे नं. (०) वार्ड क्र. (०६)
भूखंड मालमत्ता क्र.८९

पूर्व : **महेबुबसाब शेख**
पश्चिम : **रस्ता**
दक्षिण : **अमजद पठाण**
उत्तर : **हाफिज राफे सय्यद**

तरी उपरोक्त बाबतीत/यासबंधी कसल्याही प्रकारचा कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसाचे आत लेखी आक्षेप अर्ज पुराव्यासहित या कार्यालयात सादर करावा. उक्त विहित मुदतीत लेखी आक्षेप सादर न केल्यास त्याचा विचार केला जाणार नाही तसेच प्रस्तुत प्रकरणी कोणालाही कसल्याही प्रकारचा आक्षेप नसल्याचे समजण्यात येईल व पुढील कार्यवाही करणेत येईल याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित/-**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद मुखेड**

---

## मुखेड नगर परिषद, मुखेड
**नवीन प्रशासकीय इमारत, मुखेड, जि. नांदेड**
**जा.क्र.३४२०/२०२५ दि.११.०९.२०२५**

### जाहीर प्रगटन

या जाहीर प्रगटनाधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की. श्री/श्रीमती **सतिष हणमंतराव डाकुरवार** यांनी प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत बांधकाम परवानगी मिळण्याकरिता या कार्यालयात त्यांचे अर्ज सादर केला असून त्यांनी सादर केलेल्या माहितीच्या आधारे त्यांच्या जागेचे वर्णन खालील परिशिष्ट मध्ये नमूद केलेले आहे.

**परिशिष्ट**
सर्वे नं. (०) वार्ड क्र. (०६)
भूखंड मालमत्ता क्र.**३८**

पूर्व : **रस्ता**
पश्चिम : **राम काजगिरे**
दक्षिण : **उषा डाकुरवार**
उत्तर : **वसंत पोतदार**

तरी उपरोक्त बाबतीत/यासबंधी कसल्याही प्रकारचा कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसाचे आत लेखी आक्षेप अर्ज पुराव्यासहित या कार्यालयात सादर करावा. उक्त विहित मुदतीत लेखी आक्षेप सादर न केल्यास त्याचा विचार केला जाणार नाही तसेच प्रस्तुत प्रकरणी कोणालाही कसल्याही प्रकारचा आक्षेप नसल्याचे समजण्यात येईल व पुढील कार्यवाही करणेत येईल याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित/-**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद मुखेड**

---

## मुखेड नगर परिषद, मुखेड
**नवीन प्रशासकीय इमारत, मुखेड, जि. नांदेड**
**जा.क्र. /२०२५ दि.११.०९.२०२५**

### जाहीर प्रगटन

या जाहीर प्रगटनाधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की. श्री/श्रीमती **संजय रामदास गजलवाड** यांनी प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत बांधकाम परवानगी मिळण्याकरिता या कार्यालयात त्यांचे अर्ज सादर केला असून त्यांनी सादर केलेल्या माहितीच्या आधारे त्यांच्या जागेचे वर्णन खालील परिशिष्ट मध्ये नमूद केलेले आहे.(२.०/४२) द्वितीय

**परिशिष्ट**
सर्वे नं. (४०) वार्ड क्र. (०१)
भूखंड मालमत्ता क्र.**७४१/१ ए**

पूर्व : **रस्ता**
पश्चिम : **रस्ता**
दक्षिण : **कोंडाबाई मारोती संगमवाड**
उत्तर : **गजाजन सुनेवाड**

तरी उपरोक्त बाबतीत/यासबंधी कसल्याही प्रकारचा कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसाचे आत लेखी आक्षेप अर्ज पुराव्यासहित या कार्यालयात सादर करावा. उक्त विहित मुदतीत लेखी आक्षेप सादर न केल्यास त्याचा विचार केला जाणार नाही तसेच प्रस्तुत प्रकरणी कोणालाही कसल्याही प्रकारचा आक्षेप नसल्याचे समजण्यात येईल व पुढील कार्यवाही करणेत येईल याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित/-**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद मुखेड**



## दावरवाडीच्या धनगर समाजाकडुन अडीच हजार भाकरी जालना उपोषण स्थळी रवाना....!

पैठण /प्रतिनिधी

धनगर समाजाला (एस .टी) प्रवर्गातील आरक्षण मिळावे या मागणीसाठी दीपक बोराडे यांच्या सुरू असलेल्या आमरण उपोषणाला महाराष्ट्रातुन धनगर एकत्रित आला असुन तेथील बसलेले समाज बांधव यांच्या गावा गावातुन भाकरी ' लोणचं चटणी 'सुकी 'भाजी दावर वाडी तुन अडीच हजार भाकरी धनगर समाजाच्या वतीने जालना उपोषणस्थळी रवाना करण्यात आले त्यावेळी दावर वाडीचे आमचे धनगर बांधव अशोक सरगर' विष्णू सोरमारे 'ज्ञानेश्वर काळे किशोर खोलासे शिवनाथ हाके व गावातील धनगर समाज

दीपक बोराडे यांची तब्येत फार ढासळलेली आहे धनगर आरक्षणाची ही शेवटची लढाई असुन एसटी प्रवर्गातील प्रमाणपत्र घेतल्याशिवाय माघार घेणार नाही असे ते म्हणाले

# खा.डॉ.कल्याण काळे यांची अतिवृष्टीग्रस्त भागाला भेट

## चिखलातून मार्ग काढत शेतकऱ्यांशी साधला थेट संवाद

जालना/प्रतिनिधी

जिल्ह्यातील बदनापूर, अंबड व जालना तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे.या पार्श्वभूमीवर जालना लोकसभेचे खासदार डॉ.कल्याण काळे यांनी बुधवार दि.२४ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळपासून अतिवृष्टीग्रस्त भागाची पाहणी करून शेतकऱ्यांशी थेट संवाद साधला.शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचण्यासाठी डॉ.काळे यांना चिखलातून वाट काढावी लागली.मात्र त्यांनी अडचणींचा विचार न करता शेतकऱ्यांच्या शेतात प्रवेश करून नुकसान प्रत्यक्ष पाहिले.या वेळी शेतकऱ्यांनी आपल्या व्यथा खासदारांसमोर मांडल्या.

बदनापूर तालुक्यातील तळणी, वाकूळणी,अंबड तालुक्यातील मठ जळगाव,बनटाकळी,तसेच जालना



तालुक्यातील गोलापांगरीसह अनेक गावांमध्ये त्यांनी शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन कापूस,सोयाबीन व डाळीच्या पिकांचे झालेले नुकसान पाहिले.

डॉ.कल्याण काळे यांनी महसूल विभागाला तातडीने पंचनामा करण्याच्या आणि शेतकऱ्यांना त्वरित मदत पोहोचविण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या. शेतकऱ्यांच्या हालअपेष्टा लक्षात घेता शासनाने कोणताही विलंब न करता तातडीची आर्थिक मदत द्यावी अशी मागणी त्यांनी केली.

यावेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख,राजेंन राख, बदनापूर तालुका अध्यक्ष लक्ष्मण म्हसलेकर,जयप्रकाश चव्हाण, राष्ट्रवादी काँग्रेसचे राम सिरसाठ, भानुदास घुगे, कल्याण तारडे, दिनेश काकडे,बप्पासाहेब डोखळे,हनुमान धांडे,रामेश्वर फंड,जयसिंग राजपुत,सुभाष काटकर,विनायक आबा कोळकर,सुदाम काळे,तुकाराम संत,बंडु पागिरे,कृष्णा पाटील पडुळ,सोपान तिरूखे,माऊली इंगोले यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे संपूर्ण कंबरडे मोडले असून त्यांच्या जगण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

---

### मुखेड नगर परिषद, मुखेड
**नवीन प्रशासकीय इमारत, मुखेड, जि. नांदेड**
**जा.क्र.३३३२/२०२५ दि.२६.०८.२०२५**
#### जाहीर प्रगटन

या जाहीर प्रगटनाधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की. श्री/श्रीमती **रेश्माबी सुलतान शेख** यांनी प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत बांधकाम परवानगी मिळण्याकरिता या कार्यालयात त्यांचे अर्ज सादर केला असून त्यांनी सादर केलेल्या माहितीच्या आधारे त्यांच्या जागेचे वर्णन खालील परिशिष्ट मध्ये नमूद केलेले आहे.(२.०/११)[द्वितीय]

**परिशिष्ट**
सर्वे नं. (०) वार्ड क्र. (०७)
भूखंड मालमत्ता क्र.८६/१
पूर्व : **रज्जाक व खलंदर**
पश्चिम : **अब्दुल साहेब यांचा हिस्सा**
दक्षिण : **फॉरेस्ट ऑफीस**
उत्तर : **रस्ता**

तरी उपरोक्त बाबतीत/यासबंधी कसल्याही प्रकारचा कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसाचे आत लेखी आक्षेप अर्ज पुराव्यासहित या कार्यालयात सादर करावा. उक्त विहित मुदतीत लेखी आक्षेप सादर न केल्यास त्याचा विचार केला जाणार नाही तसेच प्रस्तुत प्रकरणी कोणालाही कसल्याही प्रकारचा आक्षेप नसल्याचे समजण्यात येईल व पुढील कार्यवाही करणेत येईल याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित/-**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद मुखेड**

---

### मुखेड नगर परिषद, मुखेड
**नवीन प्रशासकीय इमारत, मुखेड, जि. नांदेड**
**जा.क्र.३३३१/२०२५ दि.२६.०८.२०२५**
#### जाहीर प्रगटन

या जाहीर प्रगटनाधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की. श्री/श्रीमती **विजय निवृत्ती गायकवाड** यांनी प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत बांधकाम परवानगी मिळण्याकरिता या कार्यालयात त्यांचे अर्ज सादर केला असून त्यांनी सादर केलेल्या माहितीच्या आधारे त्यांच्या जागेचे वर्णन खालील परिशिष्ट मध्ये नमूद केलेले आहे.

**परिशिष्ट**
सर्वे नं. (०) वार्ड क्र. (०३)
भूखंड मालमत्ता क्र.२०३
पूर्व : **रस्ता**
पश्चिम : **गणपत गायकवाड**
दक्षिण : **शोभा थोरवे**
उत्तर : **निवृत्ती गायकवाड**

तरी उपरोक्त बाबतीत/यासबंधी कसल्याही प्रकारचा कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसाचे आत लेखी आक्षेप अर्ज पुराव्यासहित या कार्यालयात सादर करावा. उक्त विहित मुदतीत लेखी आक्षेप सादर न केल्यास त्याचा विचार केला जाणार नाही तसेच प्रस्तुत प्रकरणी कोणालाही कसल्याही प्रकारचा आक्षेप नसल्याचे समजण्यात येईल व पुढील कार्यवाही करणेत येईल याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित/-**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद मुखेड**

---

### मुखेड नगर परिषद, मुखेड
**नवीन प्रशासकीय इमारत, मुखेड, जि. नांदेड**
**जा.क्र.३३३३/२०२५ दि.२६.०८.२०२५**
#### जाहीर प्रगटन

या जाहीर प्रगटनाधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की. श्री/श्रीमती **अब्दुल चिनगीशॉह शेख** यांनी प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत बांधकाम परवानगी मिळण्याकरिता या कार्यालयात त्यांचे अर्ज सादर केला असून त्यांनी सादर केलेल्या माहितीच्या आधारे त्यांच्या जागेचे वर्णन खालील परिशिष्ट मध्ये नमूद केलेले आहे.

**परिशिष्ट**
सर्वे नं. (०) वार्ड क्र. (०७)
भूखंड मालमत्ता क्र.८६/२
पूर्व : **रेश्माबी यांचा हिस्सा**
पश्चिम : **रेश्माबी शेख**
दक्षिण : **रेश्माबी शेख**
उत्तर : **रस्ता**

तरी उपरोक्त बाबतीत/यासबंधी कसल्याही प्रकारचा कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसाचे आत लेखी आक्षेप अर्ज पुराव्यासहित या कार्यालयात सादर करावा. उक्त विहित मुदतीत लेखी आक्षेप सादर न केल्यास त्याचा विचार केला जाणार नाही तसेच प्रस्तुत प्रकरणी कोणालाही कसल्याही प्रकारचा आक्षेप नसल्याचे समजण्यात येईल व पुढील कार्यवाही करणेत येईल याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित/-**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद मुखेड**

---

### मुखेड नगर परिषद, मुखेड
**नवीन प्रशासकीय इमारत, मुखेड, जि. नांदेड**
**जा.क्र.३३३४/२०२५ दि.२६.०८.२०२५**
#### जाहीर प्रगटन

या जाहीर प्रगटनाधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की. श्री/श्रीमती **कैलास काशीनाथ पाटील** यांनी प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत बांधकाम परवानगी मिळण्याकरिता या कार्यालयात त्यांचे अर्ज सादर केला असून त्यांनी सादर केलेल्या माहितीच्या आधारे त्यांच्या जागेचे वर्णन खालील परिशिष्ट मध्ये नमूद केलेले आहे. (२.०/६०)

**परिशिष्ट**
सर्वे नं. (०) वार्ड क्र. (११)
भूखंड मालमत्ता क्र.०५
पूर्व : **विष्णुकांत चिद्रे**
पश्चिम : **शंकर मामीलवाड**
दक्षिण : **देविदास मामीलवाड**
उत्तर : **रस्ता**

तरी उपरोक्त बाबतीत/यासबंधी कसल्याही प्रकारचा कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसाचे आत लेखी आक्षेप अर्ज पुराव्यासहित या कार्यालयात सादर करावा. उक्त विहित मुदतीत लेखी आक्षेप सादर न केल्यास त्याचा विचार केला जाणार नाही तसेच प्रस्तुत प्रकरणी कोणालाही कसल्याही प्रकारचा आक्षेप नसल्याचे समजण्यात येईल व पुढील कार्यवाही करणेत येईल याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित/-**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद मुखेड**

---

### मुखेड नगर परिषद, मुखेड
**नवीन प्रशासकीय इमारत, मुखेड, जि. नांदेड**
**जा.क्र.३२९५/२०२५ दि.२१.०८.२०२५**
#### जाहीर प्रगटन

या जाहीर प्रगटनाधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की. श्री/श्रीमती **विनायक श्रीहरी कच्छवे** यांनी प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत बांधकाम परवानगी मिळण्याकरिता या कार्यालयात त्यांचे अर्ज सादर केला असून त्यांनी सादर केलेल्या माहितीच्या आधारे त्यांच्या जागेचे वर्णन खालील परिशिष्ट मध्ये नमूद केलेले आहे.

**परिशिष्ट**
सर्वे नं. (१८०/२/ब) वार्ड क्र. (०१)
भूखंड मालमत्ता क्र.२५/४
पूर्व : **हणमंत गायकवाड**
पश्चिम : **रस्ता**
दक्षिण : **प्लॉट नं.२६**
उत्तर : **प्लॉट नं.२४**

तरी उपरोक्त बाबतीत/यासबंधी कसल्याही प्रकारचा कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसाचे आत लेखी आक्षेप अर्ज पुराव्यासहित या कार्यालयात सादर करावा. उक्त विहित मुदतीत लेखी आक्षेप सादर न केल्यास त्याचा विचार केला जाणार नाही तसेच प्रस्तुत प्रकरणी कोणालाही कसल्याही प्रकारचा आक्षेप नसल्याचे समजण्यात येईल व पुढील कार्यवाही करणेत येईल याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित/-**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद मुखेड**

---

### मुखेड नगर परिषद, मुखेड
**नवीन प्रशासकीय इमारत, मुखेड, जि. नांदेड**
**जा.क्र.३२९२/२०२५ दि.२१.०८.२०२५**
#### जाहीर प्रगटन

या जाहीर प्रगटनाधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की. श्री/श्रीमती **बस्वेश्वर शिवसांब स्वामी** यांनी प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत बांधकाम परवानगी मिळण्याकरिता या कार्यालयात त्यांचे अर्ज सादर केला असून त्यांनी सादर केलेल्या माहितीच्या आधारे त्यांच्या जागेचे वर्णन खालील परिशिष्ट मध्ये नमूद केलेले आहे.(२.०/३)[द्वितीय]

**परिशिष्ट**
सर्वे नं. (३४) वार्ड क्र. (०२)
भूखंड मालमत्ता क्र.११९/१
पूर्व : **गोविंद डुमणे यांचा हिस्सा**
पश्चिम : **विजय गायकवाड**
दक्षिण : **रस्ता**
उत्तर : **हावगीराव स्वामी**

तरी उपरोक्त बाबतीत/यासबंधी कसल्याही प्रकारचा कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसाचे आत लेखी आक्षेप अर्ज पुराव्यासहित या कार्यालयात सादर करावा. उक्त विहित मुदतीत लेखी आक्षेप सादर न केल्यास त्याचा विचार केला जाणार नाही तसेच प्रस्तुत प्रकरणी कोणालाही कसल्याही प्रकारचा आक्षेप नसल्याचे समजण्यात येईल व पुढील कार्यवाही करणेत येईल याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित/-**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद मुखेड**

---

### मुखेड नगर परिषद, मुखेड
**नवीन प्रशासकीय इमारत, मुखेड, जि. नांदेड**
**जा.क्र.३२९३/२०२५ दि.२१.०८.२०२५**
#### जाहीर प्रगटन

या जाहीर प्रगटनाधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की. श्री/श्रीमती **स्वामी हवगीराव शिवसांब** यांनी प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत बांधकाम परवानगी मिळण्याकरिता या कार्यालयात त्यांचे अर्ज सादर केला असून त्यांनी सादर केलेल्या माहितीच्या आधारे त्यांच्या जागेचे वर्णन खालील परिशिष्ट मध्ये नमूद केलेले आहे.(२.०/२)[द्वितीय]

**परिशिष्ट**
सर्वे नं. (३४) वार्ड क्र. (०२)
भूखंड मालमत्ता क्र.११९
पूर्व : **गोविंद डुमणे यांचा हिस्सा**
पश्चिम : **विजय गायकवाड**
दक्षिण : **बस्वेश्वर शिवसांब स्वामी**
उत्तर : **रस्ता**

तरी उपरोक्त बाबतीत/यासबंधी कसल्याही प्रकारचा कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसाचे आत लेखी आक्षेप अर्ज पुराव्यासहित या कार्यालयात सादर करावा. उक्त विहित मुदतीत लेखी आक्षेप सादर न केल्यास त्याचा विचार केला जाणार नाही तसेच प्रस्तुत प्रकरणी कोणालाही कसल्याही प्रकारचा आक्षेप नसल्याचे समजण्यात येईल व पुढील कार्यवाही करणेत येईल याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित/-**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद मुखेड**

---

### मुखेड नगर परिषद, मुखेड
**नवीन प्रशासकीय इमारत, मुखेड, जि. नांदेड**
**जा.क्र.३२९४/२०२५ दि.२१.०८.२०२५**
#### जाहीर प्रगटन

या जाहीर प्रगटनाधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की. श्री/श्रीमती **प्रसाद दत्तात्रय घोगरे** यांनी प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत बांधकाम परवानगी मिळण्याकरिता या कार्यालयात त्यांचे अर्ज सादर केला असून त्यांनी सादर केलेल्या माहितीच्या आधारे त्यांच्या जागेचे वर्णन खालील परिशिष्ट मध्ये नमूद केलेले आहे.(२.०/५७)

**परिशिष्ट**
सर्वे नं. (०) वार्ड क्र. (०४)
भूखंड मालमत्ता क्र.१२३
पूर्व : **खाजा शेख**
पश्चिम : **रस्ता**
दक्षिण : **बबनराव वाकडे**
उत्तर : **सखाराम डोईजड**

तरी उपरोक्त बाबतीत/यासबंधी कसल्याही प्रकारचा कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसाचे आत लेखी आक्षेप अर्ज पुराव्यासहित या कार्यालयात सादर करावा. उक्त विहित मुदतीत लेखी आक्षेप सादर न केल्यास त्याचा विचार केला जाणार नाही तसेच प्रस्तुत प्रकरणी कोणालाही कसल्याही प्रकारचा आक्षेप नसल्याचे समजण्यात येईल व पुढील कार्यवाही करणेत येईल याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित/-**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद मुखेड**

---

### मुखेड नगर परिषद, मुखेड
**नवीन प्रशासकीय इमारत, मुखेड, जि. नांदेड**
**जा.क्र.३२९५/२०२५ दि.२१.०८.२०२५**
#### जाहीर प्रगटन

या जाहीर प्रगटनाधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की. श्री/श्रीमती **धोंडिबा राजाराम उलगुलवाड रा. मुखेड** यांनी प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत बांधकाम परवानगी मिळण्याकरिता या कार्यालयात त्यांचे अर्ज सादर केला असून त्यांनी सादर केलेल्या माहितीच्या आधारे त्यांच्या जागेचे वर्णन खालील परिशिष्ट मध्ये नमूद केलेले आहे.

**परिशिष्ट**
सर्वे नं. (-) वार्ड क्र. (०१) भूखंड मालमत्ता क्र.९८५/१
पूर्व : **शेरी व जोशी यांचे घर**
पश्चिम : **सदरील वाटणीचे स्मरण पत्र लिहून देणार व त्यांच्या दोन मुलाचा हिस्सा व त्यानंतर रस्ता**
दक्षिण : **सूर्यकांत उल्लडवाड**
उत्तर : **रस्ता**

तरी उपरोक्त बाबतीत/यासबंधी कसल्याही प्रकारचा कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसाचे आत लेखी आक्षेप अर्ज पुराव्यासहित या कार्यालयात सादर करावा. उक्त विहित मुदतीत लेखी आक्षेप सादर न केल्यास त्याचा विचार केला जाणार नाही तसेच प्रस्तुत प्रकरणी कोणालाही कसल्याही प्रकारचा आक्षेप नसल्याचे समजण्यात येईल व पुढील कार्यवाही करणेत येईल याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित/-**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद मुखेड**

---

### मुखेड नगर परिषद, मुखेड
**नवीन प्रशासकीय इमारत, मुखेड, जि. नांदेड**
**जा.क्र.३२९५/२०२५ दि.२१.०८.२०२५**
#### जाहीर प्रगटन

या जाहीर प्रगटनाधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की. श्री/श्रीमती **हाके रामदास दशरथ** यांनी प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत बांधकाम परवानगी मिळण्याकरिता या कार्यालयात त्यांचे अर्ज सादर केला असून त्यांनी सादर केलेल्या माहितीच्या आधारे त्यांच्या जागेचे वर्णन खालील परिशिष्ट मध्ये नमूद केलेले आहे.

**परिशिष्ट**
सर्वे नं. (५५) वार्ड क्र. (०५) भूखंड मालमत्ता क्र.९०५
पूर्व : **रस्ता**
पश्चिम : **जागा क्र.०७ शिवाजी कांबळे**
दक्षिण : **जागा क्र.१४ गुंडेराव हाके**
उत्तर : **रस्ता १५ फुटाचा**

तरी उपरोक्त बाबतीत/यासबंधी कसल्याही प्रकारचा कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसाचे आत लेखी आक्षेप अर्ज पुराव्यासहित या कार्यालयात सादर करावा. उक्त विहित मुदतीत लेखी आक्षेप सादर न केल्यास त्याचा विचार केला जाणार नाही तसेच प्रस्तुत प्रकरणी कोणालाही कसल्याही प्रकारचा आक्षेप नसल्याचे समजण्यात येईल व पुढील कार्यवाही करणेत येईल याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित/-**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद मुखेड**

---

### मुखेड नगर परिषद, मुखेड
**नवीन प्रशासकीय इमारत, मुखेड, जि. नांदेड**
**जा.क्र.३२९५/२०२५ दि.२१.०८.२०२५**
#### जाहीर प्रगटन

या जाहीर प्रगटनाधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की. श्री/श्रीमती **लक्ष्मीकांत बाबुराव दुधकवडे** यांनी प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत बांधकाम परवानगी मिळण्याकरिता या कार्यालयात त्यांचे अर्ज सादर केला असून त्यांनी सादर केलेल्या माहितीच्या आधारे त्यांच्या जागेचे वर्णन खालील परिशिष्ट मध्ये नमूद केलेले आहे. (२.०/४३)[द्वितीय]

**परिशिष्ट**
सर्वे नं. (-) वार्ड क्र. (०१) भूखंड मालमत्ता क्र.१४३९/१
पूर्व : **भाग्यश्री दिगांबर मंडलापुरे**
पश्चिम : **समाज मंदिर (रोहिदास महाराज)**
दक्षिण : **दुधवाड**
उत्तर : **रस्ता**

तरी उपरोक्त बाबतीत/यासबंधी कसल्याही प्रकारचा कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसाचे आत लेखी आक्षेप अर्ज पुराव्यासहित या कार्यालयात सादर करावा. उक्त विहित मुदतीत लेखी आक्षेप सादर न केल्यास त्याचा विचार केला जाणार नाही तसेच प्रस्तुत प्रकरणी कोणालाही कसल्याही प्रकारचा आक्षेप नसल्याचे समजण्यात येईल व पुढील कार्यवाही करणेत येईल याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित/-**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद मुखेड**

---

### मुखेड नगर परिषद, मुखेड
**नवीन प्रशासकीय इमारत, मुखेड, जि. नांदेड**
**जा.क्र.३२९५/२०२५ दि.२१.०८.२०२५**
#### जाहीर प्रगटन

या जाहीर प्रगटनाधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की. श्री/श्रीमती **राजाराम धोंडीबा उलगुलवाड** यांनी प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत बांधकाम परवानगी मिळण्याकरिता या कार्यालयात त्यांचे अर्ज सादर केला असून त्यांनी सादर केलेल्या माहितीच्या आधारे त्यांच्या जागेचे वर्णन खालील परिशिष्ट मध्ये नमूद केलेले आहे.

**परिशिष्ट**
सर्वे नं. (-) वार्ड क्र. (०१) भूखंड मालमत्ता क्र.९८५
पूर्व : **जोशी**
पश्चिम : **रस्ता**
दक्षिण : **स्वतःची इतर मालमत्ता**
उत्तर : **रस्ता**

तरी उपरोक्त बाबतीत/यासबंधी कसल्याही प्रकारचा कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ०७ दिवसाचे आत लेखी आक्षेप अर्ज पुराव्यासहित या कार्यालयात सादर करावा. उक्त विहित मुदतीत लेखी आक्षेप सादर न केल्यास त्याचा विचार केला जाणार नाही तसेच प्रस्तुत प्रकरणी कोणालाही कसल्याही प्रकारचा आक्षेप नसल्याचे समजण्यात येईल व पुढील कार्यवाही करणेत येईल याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित/-**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद मुखेड**

# महिला सक्षमीकरणासाठी शासन कटिबद्ध : आ. लोणीकर

## रमाई लोकसंचलित साधन केंद्र तळणीची १५ वी वार्षिक सभा उत्साहात





तळणी /वार्ताहर

महिला आर्थिक विकास महामंडळाच्या ग्रामीण नवतेजस्विनी उद्यम विकास अभियान अंतर्गत तालुका अभियान कक्ष मंठा व रमाई लोकसंचलित साधन केंद्र तळणी यांची १५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा व महिला सभा कुलस्वामिनी मंगल कार्यालय, तळणी येथे मोठ्या उत्साहात पार पडली.

कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार बबनराव लोणीकर यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी गौतम सदावर्ते तर प्रमुख उपस्थितीत प्रतिभा गोरे, जिल्हा समन्वय अधिकारी संजय गायकवाड आणि प्रवीणकुमार कुथे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

सभेच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले.

लोणीकर म्हणाले की, महिलांना शिक्षण, आरोग्य, आर्थिक स्वावलंबन आणि सामाजिक सुरक्षितता देऊन समाजात समान संधी उपलब्ध करून देणे हे शासनाचे उद्दिष्ट आहे. महिला बचत गटांना कमी व्याजदरात कर्ज, मुद्रा योजना, स्टँड अप इंडिया अशा योजनांतून प्रोत्साहन दिले जात आहे. महिलांच्या आरोग्य व सुरक्षिततेसाठी शासन कटिबद्ध असून, आरक्षणामुळे त्यांना नेतृत्वाची संधी मिळत आहे.

तसेच, बेटी बचाओ-बेटी पढाओ, लाडकी बहीण, सुकन्या समृद्धी, उज्ज्वला, मातृ वंदना, तेजस्विनी महिला सक्षमीकरण, महिला बचत गट योजना अशा केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा महिलांना लाभ मिळत असल्याचेही त्यांनी सांगितले.

यावेळी राजेश मोरे ,गजानन देशमुख, दारासिंग चव्हाण किशोर हनवते, दत्तराव कांगणे, माऊली सरकटे, नितीन सरकटे ,नवनाथ खंदारे, विलास घोडके ,रामकिसन बोडके, गुलाबराव राठोड ,मनोज देशमुख, शरद पाटील, भगवानराव देशमुख,सरपंच सुनील कांगणे, सरपंच कृष्णा खंदारे , सरपंच प्रभाकर बोरुडे, रामेश्वर सरकटे,सतीश सरकटे,मालता चव्हाण मंदाबाई जाधव मालण शेजुळे सुनंदाबाई जाधव पार्वती मुदळकर संगीता राठोड छाया पवार इंदुबाई लांडगे गीता देशमुख यांच्यासह यांच्यासह परिसरातील अनेक महिला व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### बदामराव पंडितांनी बोऱ्हाडेंची भेट घेऊन

# धनगर समाजाच्या आरक्षणाला दिला पाठिंबा

गेवराई ( प्रतिनिधी ) हैदराबाद गॅझेट लागू करून राज्यातील धनगर समाजांना एसटीचे आरक्षण द्या या मागणीसाठी जालना जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणाला बसलेल्या दीपक बोऱ्हाडे यांची माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी आंदोलन स्थळी भेट घेऊन धनगर समाजाच्या आरक्षणाला पाठिंबा जाहीर केला आहे.

मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षण मागणीसाठी आंदोलन केल्यानंतर राज्य सरकारने हैदराबाद गॅझेट लागू करण्यासंदर्भात जीआर काढला आहे. या हैदराबाद गॅझेटच्या जीआरची अंमलबजावणी करून धनगर समाजाला एसटी प्रवर्गातील आरक्षण द्यावे या मागणीसाठी धनगर समाजाचे नेते दीपक बोऱ्हाडे हे गेल्या सहा दिवसापासून जालना जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करत आहेत. राज्याचे माजी राज्यमंत्री तथा गेवराई विधानसभा मतदारसंघाचे नेते बदामराव पंडित यांनी दिनांक २२ सप्टेंबर २०२५ रोजी जालना येथे जाऊन आंदोलन स्थळी दीपक बोऱ्हाडे यांची भेट घेतली. धनगर समाजाची आरक्षणाच्या संदर्भातल्या मागणीला आपला पाठिंबा असून, राज्य सरकारने याबाबत ठोस भूमिका घेऊन आंदोलनकर्ते दीपक बोऱ्हाडे यांचे आमरण उपोषण सोडवणे गरजेचे असल्याचे मत यावेळी बदामराव पंडित यांनी व्यक्त केले. यावेळी धनगर समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राष्ट्रीय चर्मकार महासंघाचा वर्धापन दिन शैक्षणिक साहित्य वाटप करून केला साजरा

माजलगाव (प्रतिनिधी)राष्ट्रीय चर्मकार महासंघ शाखा माजलगाव वतीने शाहु माध्यमिक विद्यालय पात्रुड येथे शैक्षणिक साहित्य व विद्यार्थ्यांना खाऊ वाटून राष्ट्रीय चर्मकार महासंघाचा तीसवा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाची सुरुवात महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करून माणिक राधाकिसन घोडके यांना श्रद्धांजली अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. या कार्यक्रमाचे उद्घाटक कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव हरिभाऊ सवने,कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून व्यापारी महासंघ तालुका अध्यक्ष सुरेंद्र रेदासानी तर तर प्रमुख पाहुणे म्हणून महादेव सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष सिताराम सोनवणे व राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे जिल्हा अध्यक्ष नानासाहेब घोडके तसेच युवा जिल्हाध्यक्ष राजेश जाधव तालुकाध्यक्ष सुभाष कांबळे कार्यक्रमासाठी उपस्थित होते.या कार्यक्रमाचे विशेष सत्कारमूर्ती म्हणून रोटरी क्लब ऑफ माजलगाव यांच्या वतीने आदर्श शिक्षक पुरस्कार मिळालेले वाडेकर सर यांचा महासंघाच्या वतीने सत्कार करण्यात आला.



या कार्यक्रमाचे उद्घाटक हरिभाऊ सवने यांनी आपल्या भाषणामध्ये श्री संत गुरू रविदासांचे विचार तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे योगदान याबद्दल मार्गदर्शन केले.तसेच जिल्हाध्यक्ष नानासाहेब घोडके यांनी राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या उभारणीमध्ये महासंघाचे संस्थापक अध्यक्ष बबनरावजी घोलपसाहेब यांच्या कार्याचा उल्लेख करत तळागाळातील लोकांना गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल व विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा समाज कल्याण विभागाच्या मार्फत उपलब्ध करून दिल्याचे विवेचन आपल्या भाषणामध्ये प्रस्ताविकामध्ये नानासाहेब घोडके यांनी केले. अध्यक्ष भाषणामध्ये सुरेंद्र रेदासानी यांनी राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या सामाजिक कार्यातील योगदानाबद्दल व आदरणीय बबनराव घोलप यांच्या कार्याला उजाळा देताना सर्व समाजाने एकत्रितरित्या येऊन समाज चळवळीमध्ये योगदान देण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

यावेळी सत्काराला उत्तर देताना आदर्श शिक्षक श्री अशोक वाडेकर बोलताना म्हणाले राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय बबनराव घोलप साहेब यांनी अतिशय कष्टातून ही संघटना स्थापन केली असून या संघटनेचे रोपट राज्यातील गावागावापर्यंत पोहोचण्याचा कार्य कार्यकर्ता म्हणून आपण सर्वांनी केले पाहिजे.आदरणीय बबनरावजी घोलप साहेब यांचे स्वप्न साकार करण्याचे काम आपण सर्वांनी केले पाहिजे.या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय चर्मकार महासंघ शाखा माजलगाव यांच्या वतीने ३००विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊ वाटप करून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन पर गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र सन्मानचिन्ह व पुष्पहार देऊन सन्मानित करण्यात आले.या कार्यक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक मात्रे बी.के., विश्वशांती आश्रम शाळेचे मुख्याध्यापक शिंदे व्हि. आर.,सावित्रीबाई फुले प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक सचिन वाघमारे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गिन्यानदेव नावडकर, तालुका उपाध्यक्ष अर्जुन पोहेकर,जिल्हा संघटक राधाकीसन भाळशंकर, भाजपा तालुका सरचिटणीस संतोष जाधव व शाहू विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी कार्यक्रमाचे वेळी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जगताप आर.एम.यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार वडचकर सर यांनी मानले.

# मनाची मशागत करा आयुष्याचे सोने होईल-संतोष गर्जे

## जयभवानीत राष्ट्रीय सेवा योजना दिन साजरा




गेवराई (प्रतिनिधी)

राष्ट्रीय सेवा योजना युवकांना सर्वांगाने घडवते, यातून विद्यार्थ्यांनी स्वतःची ओळख निर्माण करावी. वर्तमानात जगायला शिका, आहे त्यात जगा. हार मानू नका मनाची मशागत करा, आयुष्याचे सोने होईल असे आवाहन सहारा बालग्राम अनाथालयाचे संस्थापक संतोष गर्जे यांनी केले. जयभवानी कनिष्ठ महाविद्यालयात आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते.

शिवाजीनगर गढी येथील जयभवानी कनिष्ठ महाविद्यालयात २४ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय सेवा योजना दिनाच्या निमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य वसंत राठोड, उपप्राचार्य प्रा. आनंद बडवे, प्रा. राजेंद्र जाधव यांच्यासह मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते प्रारंभी संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला प्रारंभ झाला. कार्यक्रमात संतोष गर्जे यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. पुढे बोलताना ते म्हणाले की, जीवन सुंदर आहे ते जगता आले पाहिजे. आपल्याकडे सर्व काही आहे, आपण खरे खरोखर भाग्यवान आहोत. ज्यांच्याकडे काहीच नाही त्यांच्याकडे पाहून आपण कृतज्ञता पाळली पाहिजे असेही ते यावेळी म्हणाले. यावेळी प्रा. राजेंद्र जाधव म्हणाले की, विद्यार्थ्यांनी स्वच्छतेची सुरुवात स्वतःपासून करावी स्वतःच्या दारात एक झाड लावून वृक्षारोपणाची सुरुवात करावी असेही ते यावेळी म्हणाले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे गोपाळ ईश्वरे म्हणाले की व, परिस्थितीवर मात करूनही आपण मोठ्या पदापर्यंत जाऊ शकतो, त्यासाठी ध्येयावर आपण ठाम राहून कठोर मेहनत आपण घेतली पाहिजे असेही ते म्हणाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात प्राचार्य राठोड म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी शिबिरात सहभाग घेऊन समाज मूल्यांची जोपासना करावी.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी प्रा. लगड एस. एस. यांनी केले. राष्ट्रीय सेवा योजना विभागाचा उद्देश विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास असून आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो या भावनेतून विद्यार्थ्यांनी ग्राम स्वच्छता, परिसर स्वच्छता आणि श्रमदान उपक्रमामध्ये सहभाग नोंदवावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले. याप्रसंगी प्रा. गायकवाड, प्रा.तनपुरे, प्रा पवळ, प्रा. पंडित, प्रा. श्रीमती जगदाळे यांच्यासह राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा

## बीडमध्ये ८ उपकेंद्रावर २०४० परीक्षार्थी

बीड /प्रतिनिधी

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा २०२५ दिनांक २८ सप्टेंबर २०२५ रोजी बीड जिल्हा केंद्रावरील एकूण ०८ उपकेंद्रामधून सकाळी १०.०० ते दुपारी १२.०० व दुपारी दुसरे सत्र ०३ ते ०५.०० वाजता अशी दोन सत्रात घेण्यात येणार आहे. या परीक्षेसाठी एकूण २ हजार ४० उमेदवार बसलेले आहेत.

परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी ०८ उपकेंद्रप्रमुख १६ मदतनीस ३२ पर्यवेक्षक १०३ समवेक्षक असे एकूण १५९ अधिकारी, कर्मचारी यांची जिल्हा प्रशासनाद्वारे नियुक्ती करण्यात आलेली आहे.

सदर नियुक्त अधिकारी, कर्मचारी यांना दिनांक २३ सप्टेंबर २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिल्हा नियोजन सभागृह बीड येथे निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा केंद्र प्रमुख यांनी परीक्षेच्या अनुषंगाने प्रशिक्षण दिले आहे.

१०० मीटर परिघात मनाई आदेश

परीक्षेच्या कालावधीत उपकेंद्रावर कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी परीक्षा उपकेंद्रावर पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आलेला आहे. तसेच परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये मनाई आदेश लागू करण्यात आलेला आहे.आयोगाच्या सूचनेनुसार या परीक्षेसाठी बसलेल्या उमेदवारांना त्यांच्याकडील मोबाईल, पेजर, कॅल्क्युलेटर, इलेक्ट्रॉनिक वस्तू आणि अभ्यासाचे इतर साहित्य परीक्षा केंद्रावर घेऊन जाण्यास मनाई आहे. आयोगाने दिलेल्या सूचनेप्रमाणे उमेदवारांना जेवणाचा डबा, अल्पोपहार व पाण्याची बॉटल घेऊन जाण्यास परवानगी देण्यात येत आहे. दोन पेपरच्या मध्यल्या वेळेमध्ये उमेदवारांना परीक्षा उपकेंद्राच्या बाहेर जाण्यास मनाई आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने नेमून दिलेल्या परीक्षेचे आवश्यक साहित्यच उमेदवारांना जवळ बाळगण्याची मुभा राहील तसेच सर्व उमेदवारांनी परीक्षेच्या वेळी प्रवेश पत्रासोबत त्यांचे स्वतःच्या आधारकार्ड, निवडणूक आयोगाची ओळखपत्र, पासपोर्ट किंवा ड्रायव्हिंग लायसन्स (फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे) यापैकी कोणत्याही एका ओळखपत्राची छायांकित प्रत सोबत आणणे आवश्यक आहे.उमेदवारांना त्यांच्या परीक्षा उपकेंद्रावर पेपर क्रमांक -०१ सकाळी ०८.३० वाजता व पेपर क्रमांक ०२ सत्रामध्ये दुपारी १.३० वाजता उपस्थित राहावे. सकाळच्या सत्रात ०९.३० वाजेनंतर आणि दुपारच्या सत्रात २.३० वाजेनंतर परीक्षा केंद्रावर येणाऱ्या उमेदवारांना कोणत्याही कारणास्तव प्रवेश देण्यात येणार नाही, असे निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवले आहे.

# संपूर्ण घनसावंगी तालुक्यातील शेतकर्यांना तात्काळ आर्थिक नुकसान भरपाई द्या-रा.कॉ.पार्टी( शरदचंद्र पवार)

घनसावंगी:- घनसावंगी तालुक्या मध्ये सुरु असलेल्या ढगफुटी सदृश्य पावसामुळे शेतीचे आतोनात नुकसान झालेले असून प्रशासनाच्या सदोष पर्जन्यमापक यंत्रामुळे शासनाने घनसावंगी तालुक्यातील घनसावंगी,रांजणी, राणीउंचेगाव,पानेवाडी आदी महसूल मंडळांना बाधितक्षेत्रातून वगळल्यामुळे तालुक्यातील सर्वाधिक पाऊस होऊन प्रचंड नुकसान झालेल्या शेतकर्यांना शासकीय नुकसान भरपाई मिळणार नसल्याने शेतकरी आस्मानी-सुलतानी या दोन्ही संकटात अडकला आहे.

शेतकर्यावर होणार्या या दुहेरी अन्यायाला वाचा फोडण्यासाठी व संपुर्ण घनसावंगी तालुक्यातील शेतकर्यांना तात्काळ नुकसान भरपाई मिळावी



यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने आज दि.२३ सप्टेंबर रोजी पक्षाचे प्रदेश सरचिटणीस नंदकुमार देशमुख यांच्या नेतृत्वाखाली उपविभागीय अधिकारी उमाकांत पारधी यांना निवेदन देण्यात आले.यावेळी प्रभाकरराव धाईत,कल्याणराव सपाटे,संभाजी देशमुख, पांडूरंग कथले,शेख मुमताज,अँड.राजेश्वरराव देशमुख,सय्यद नवाब,जमीलबाबा सौदागर, भास्करराव गाढवे,प्रल्हाद नाईक,यशवंतराव देशमुख, अन्नासाहेब साबळे, अतिक पटेल , मुक्ताराम सोनवणे यांच्यासह मोठ्याप्रमाणात पदाधिकारी,सरपंच,कार्यकर्ते,शेतकरी उपस्थित होते.

# विद्यार्थीनींनी बहुभाषिक झाले पाहिजे.- डॉ. राजाभाऊ चव्हाण.

# महिला महाविद्यालयात हिंदी सप्ताह साजरा

गेवराई (प्रतिनिधी)

भाषा ही माणसाला जोडण्याचे कार्य करते. त्यामुळे विद्यार्थीनींनी भाषिक राजकारणात न अडकता बहुभाषिक झाले पाहिजे. असे प्रतिपादन डॉ. राजाभाऊ चव्हाण यांनी केले. ते जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे महिला महाविद्यालय, गेवराई च्या 'हिंदी विभाग' आयोजित हिंदी सप्ताह समारोप प्रसंगी अध्यक्ष म्हणून बोलत होते. यावेळी विचार मंचावर विभाग प्रमुख प्रा. डॉ. संगिता आहेर व प्रा. डॉ. रामहरी काकडे हे उपस्थित होते.

दरवर्षी १४ सप्टेंबर हा 'हिंदी दिवस' म्हणून साजरा केला जातो. १४ ते २१ सप्टेंबर हा सप्ताह 'हिंदी सप्ताह' साजरा करुन विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. गेवराई येथील महिला महाविद्यालयाच्या 'हिंदी विभाग' द्वारे ही सुलेखन, काव्यपाठ, भित्तीपत्रक प्रकाशन इ. उपक्रम घेऊन 'हिंदी सप्ताह' साजरा केला.




महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजाभाऊ चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या सप्ताह चा समारोप संपन्न झाला. यावेळी बोलताना ते म्हणाले की, भारत हा बहुभाषिक राष्ट्र आहे. हिंदी भाषा ही सर्व भाषांना जोडण्याचे कार्य करते.भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील नेत्यांनीही हिंदी भाषेचा उपयोग लोकांना जोडण्यासाठी केला आहे. त्यामुळे विद्यार्थीनींनी भाषिक राजकारणात न अडकता बहुभाषिक झाले पाहिजे. तरच रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. विभाग प्रमुख प्रा. डॉ. संगिता आहेर यांनी राष्ट्रीय एकात्मतेसाठी हिंदी भाषेचे महत्त्व सांगितले. पुढे बोलताना त्या म्हणाल्या की, मातृभाषा व हिंदी भाषा चांगल्या प्रकारे आत्मसात केल्यास रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. यावेळी हिंदी विभागातील महक बागवान व हुमेरा बागवान यांनी तयार केलेल्या 'दर्पण' या भित्तीपत्रकाचे मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# कारेगाव फाटा येथील शेतकरी संघर्ष समितीचे उपोषण १७ दिवसांनी स्थगित

## आश्वासनाची पूर्तता नाही केल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा

तहसीलदार सुरेखा स्वामी यांनी प्रत्यक्ष उपोषण स्थळी येवून दिले पत्र

धर्माबाद /अशोक पडोळे

तालुक्यात अतिवृष्टी व तेलंगानातील पोचमपाड श्रीराम सागर च्या बॅक वाटरणे धर्माबाद ,उमरी , बिलोली, नायगाव या चार तालुक्यातील शेती पाण्याखाली बुडाल्याने शंभर टक्के नुकसान झाले आहे. अतिवृष्टीने ओला दुष्काळ जाहीर करावा, पाण्याखालील बुडीत जमीनीचा मावेजा द्यावा, विमा वाढवुन मिळावा अशा इतर मागण्यासाठी कारेगाव फाटा येथे १७ दिवसापासून शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने साखळी उपोषण चालू होते. याची नोंद जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी घेऊन राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभेचे खा. अशोक रावजी चव्हाण, नांदेड लोकसभेचे खा.प्रा. रवींद्र चव्हाण, विधानसभा चे आ. राजेशजी पवार, यांनी शेतकरी संघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्यांची जिल्हाधिकारी कार्यालयात सकारात्मक चर्चा करून मागण्या मंजूर करण्यासाठी पंधरा दिवसाचा कालावधी मागितला आहे. धर्माबाद चे तहसीलदार सुरेखा स्वामी यांच्या हस्ते शेतकरी संघर्ष समितीचे नेते डॉ.भगवानराव मनुरकर यांना साखळी उपोषण पंधरा दिवस स्थगित करण्याचे पत्र देण्यात आले आहे. यावेळी पाच तालुक्यातील शेतकरी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

जिल्ह्यात व धर्माबाद तालुक्यात २७ ते ३० ऑगस्ट २०२५ चार दिवसात अतिवृष्टी झाल्याने गोदावरी नदीस महाभयंकर पूर आला, तेलंगाना राज्यातील पोचमपहाड येथील श्रीराम सागर धरणाच्या बॅक वाटरणे व गोदावरी, मांजरा नदी तसेच हरिद्रा या तीन नद्यांच्या संगमावर पुराच्या पाण्यामुळे बळेगाव पर्यंतच्या नदीच्या परिसरातील सखल भाग पाण्याखाली



आल्याने समुद्रासारखा परिसर झाला होता. काही गावांना पाण्याचा वेढा दिल्याने त्यांना जहाजाने स्थलांतरित केले आहे. चार तालुक्यातील शेतकरी शेती पाण्याखाली बुडाल्याने आत्महत्या करण्याचाही प्रयत्न केला आहे. पाच दिवस पुराच्या पाण्याने खरिपाची पिके सडून गेली. बॅक वॉटरने पूर्ण शेती बुडून गेली.बॅक वॉटर मुळे झालेल्या बुडीत शेतीचा मावेजा मिळावा, अतिवृष्टीमुळे ओला दुष्काळ जाहीर करावा, पिक विमा ताबडतोब वाढवुनन मिळवावा, नांदेड जिल्ह्यासाठी विशेष पॅकेज देण्यात यावी अशा मागणीसाठी दि. ८ सप्टेंबर २०२५ पासून कारेगाव फाटा येथे चार तालुक्यातील शेतकऱ्यांनी साखळी उपोषण सुरू केले आहे. शासन साखळी उपोषणाकडे लक्ष देत नसल्याने आमदार,खासदार व लोकप्रतिनिधी याना गाव बंदी व रस्ता रोको आंदोलन करण्याची भूमिका शेतकऱ्यांनी घेतली. आंदोलन तीव्र होत असल्याचे पाहून दि. २३ सप्टेंबर रोजी जिल्हा अधिकारी राहुल कर्डिले यांनी शेतकरी संघर्ष समितीच्या कार्यकर्त्यांची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित केली होती.या बैठकीस माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभेचे खा. मा.अशोक रावजी चव्हाण, नांदेड लोकसभेचे खा.प्रा. रवींद्रजी चव्हाण, नायगाव विधानसभा मतदारसंघाचे आ.राजेशजी पवार यांच्या उपस्थितीत ही संघर्ष समितीच्या कार्यकर्त्यांशी त्यांच्या मागण्यांच्या संदर्भात सकारात्मक चर्चा झाली, शेतकरी संघर्ष समितीचे नेते डॉ. भगवानराव मुनुरकर यांनी मागण्या सविस्तर मांडले आहेत.

सर्व मागण्यांचे सविस्तर चर्चा होऊन सकारात्मक चर्चा झाल्याने साखळी उपोषणास पंधरा दिवसासाठी स्थगित करण्याचे मान्य करण्यात आले आहे. सतराव्या दिवशी दि. २४ सप्टेंबर २०२५ रोजी कारेगाव फाटा येथील उपोषण स्थळी धर्माबादचे तहसीलदार सुरेखा स्वामी यांनी शेतकरी संघर्ष समितीचे नेते डॉ.भगवानराव मनुरकर यांना सर्व शेतकऱ्या समक्ष पंधरा दिवस उपोषण स्थगित करण्याचे पत्र दिलेआहे. दिलेले पत्र वाचन करून साखळी उपोषण स्थगित करण्यात आले असले तरीही दिलेल्या पत्रकाप्रमाणे मागण्या मंजूर नाही झाल्यास शेतकरी संघर्ष समिती तीव्र आंदोलन करेल असा इशारा देण्यात आला आहे . यावेळी नायब तहसीलदार परमानंद गावंडे हे उपस्थित होते.

यावेळी बैठकीचे अध्यक्ष बाभळी बंधारा कृती समितीचे अध्यक्ष नागोराव पाटील रोशनगावकर, सचिव डॉ.बालाजी कोम्पलवार, कार्यालयीन सचिव शंकराव जाधव रोशनगावकर, सहसचिव जी.पी.मिसाळे, गोविंद रामोड, शेतकरी संघटनेचे जिल्हा अध्यक्ष एडवोकेट धोंडीबा पवार, सुधाकर पाटील जुनी कर, रुपेश पाटील चोळाखेकर, नारायण पाटील रामपूरकर, तानाजी पाटील चिखलीकर, गोविंदराव पाटील जाधव, शिवराज भडांगे, व्यंकटराव कदम बेलगुजरीकर, मारुती जाधव, सर्जेराव कदम बाभळी, हनुमंतराव जगदंबे कारेगाव, दादू मिया शिरजखोड, गणेश वाघमारे चिकना, पमु पाटील आटाळा, नागनाथ जिंकले वंचित चे तालुका अध्यक्ष, बालाजी पाटील कारेगाव, जयराम पाटील कारेगाव, ता. धर्माबाद,नायगाव, उमरी, बिलोली,मुदखेड या तालुक्यातील शेकडो शेतकऱ्यांची उपस्थिती होती.

## पाटोदा तालुक्यासह संपुर्ण बीड जिल्हा ओला दुष्काळ जाहिर करुन बाधीत शेतकरी व इतरांना तात्काळ

## आर्थिक मदत करा:- भाई विष्णुपंत घोलप

पाटोदा (प्रतिनिधी) पाटोदा तालुक्यासह संपुर्ण बीड जिल्ह्यात ६५ मी.मी.पेक्षा अधिकचा पाऊस सर्व महसुल मंडळात झालेला आहे. शासनाचे ओल्या दुष्काळाचे निकष आजच्या परिस्थितीत पुर्ण झालेले असुन काही ठिकाणी ६६ मी.मी.ते १५८ मी.मी.पावसाची नोंद शासनाकडे असुन या वर कोणताही विलंब न लावता बीड जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहिर करावा जेणे करुन केंद्र व राज्य सरकारला आपत्कालीन परिस्थितीत सर्वांना आर्थिक मदत करता येईल. अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांची उभी पीके व कित्येकांची घरे उध्वस्त झाली म्हणजे वाहुन गेली. काही ठिकाणी शेतकऱ्यांची जमीनीवरील माती पुर्ण वाहुन गेली. कित्येक व्यापारी अतिवृष्टीच्या तडाख्यात सापडले त्यांचे खुप मोठे आर्थिक नुकसान झाले. कित्येकांची



जनावरे (पशुधन) गाई, म्हैसी, शेळ्या, कोंबड्या आणि इतर वाहुन गेल्या किंवा मृत पावल्या आहेत. तसेच शेतकऱ्यांच्या जलसिंचन विहिरी बुजल्या गेल्या, कित्येकाच्या घरात, दुकानात, गोडाऊनमध्ये पाणी साचल्यामुळे खुप मोठे आर्थिक नुकसान झालेले आहे. त्यासाठी पाटोदा तालुक्यासहीत संपुर्ण बीड जिल्ह्यातील अतिवृष्टीने बाधीत झालेल्या जनतेला तात्काळ आर्थिक मदत करावी, तुटपुंज्या मदतीवर जनतेची अवहेलना करु नये नसता राजा उधार झाला आणि हाती भोपळा दिला अशी परिस्थिती झाल्यास अतिवृष्टीने बाधीत जनता शासनाच्या विरोधात उद्रेक करेल याची शासनाने गांभीर्याने नोंद घ्यावी. अशा विषयाचे लेखी निवेदनाव्दारे उपविभागीय अधिकारी कार्यालय पाटोदा यांच्या मार्फत महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री व माहितीस्तव उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे व अजित दादा पवार, कृषीमंत्री दत्तात्रय भरणे, मंत्री पंकजाताई मुंडे, बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग(बप्पा)सोनवणे, शेकापचे सरचिटणीस मा.आ.भाई जयंत पाटील, यांना कळविले आहे.

## सरपंच परिवंत गायकवाड यांनी स्वखर्चातुन केला आडिच कि.मी.चा रस्ता दुरुस्त

### क-हेवडगाव येथील तलावाखालील नागरगोजेवस्ती ते नगर-बीड रोड झाला रस्ता दुरुस्त

आष्टी - (प्रतिनिधी) आष्टी तालुक्यातील क-हेवडगाव गावाच्या शिवारात असलेल्या मोठ्या तलावाच्याखाली

असलेल्या नागरगोजेवस्ती ते अ. नगर ते बीड राज्य महामार्गापर्यत सरपंच परिवंत गायकवाड यांनी ग्रामस्थांच्या सोयीसाठी स्वखर्चाने आडीच कि. मि. रस्ता दुरूस्ती केली आहे. हा रस्ता नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीने पूर्णपणे खराब व खड्डेमय झाला होता. शासकीय निधी उपलब्ध होण्याची वाट न पाहता आ. सुरेश धस यांच्या आदेशाने हा आडीच कि. मि. चा रस्ता खडी व मुरुम टाकुन दुरुत केला आहे. त्यामुळे शालेय विद्यार्थी, दुध उत्पादक शेतकरी, ग्रामस्थ यांची वाहतुकीची सोय झाली आहे.

सरपंच परिवंत गायकवाड यांच्या या तात्काळ केलेल्या रस्ता दुरुस्ती कामाचे कौतुक होत आहे. यापुर्वी नेत्रतपासणी व मोफत चष्मे वाटप, रक्तदान शिबीरे, शालेय विद्यार्थीना गणवेश व शालेय साहित्य वाटप व नवरात्र उत्सवानिमित्त तुळजापूर येथुन आणण्यात येणाऱ्या ज्योतसाठी क-हेवडगाव येथील



युवकांना आर्थिक मदत केली आहे. सामाजिक व धार्मिक कार्यात सरपंच गायकवाड यांचा मोठा पुढाकार व अर्थसहाय्य असते. ग्रामविकास करीत ते घरकुल योजना, शेततळे, जलसिंचन विहीरी, पांदण रस्ते, वस्ती रस्ते आदि वैयक्तिक लाभाच्या जास्तीजास्त योजना ते वैयक्तिक लक्ष देऊन राबवितात. याशिवाय क-हेवडगाव येथील जि. प. प्रा. शाळेला २५ लाख रु. सरंक्षण भिंत बांधकाम, नागरगोजेवस्ती येथील जि. प. प्रा. वस्ती शाळेसही २५ लाख रु. चे सरंक्षण भिंत बांधकाम मंजुर केले आहे. या ५० लाख रु. च्या निधी मंजुरीसाठी लोकप्रिय आ. सुरेश धस यांचे मोठे सहकार्य लाभलेले आहे असे सरपंच परिवंत गायकवाड यांनी सांगितले.

विविध विकास योजना दर्जेदारपणे राबविल्याने ग्रामपंचायत सदस्य जालींदर हौसराव खांडवे, आप्पासाहेब नागरगोजे, शुभम खांडवे, अशोक विधाते, अर्जुन बांगर, सुग्रीव नागरगोजे व क-हेवडगाव ग्रामस्थांनी सरपंच परिवंत गायकवाड यांचे अभिनंदन केले आहे. या गावातील युवक वर्गही सरपंच परिवंत गायकवाड यांच्यावर खुष आहेत.

## शेतकऱ्यांना हेक्टरी १ लाख रुपयांची तात्काळ मदत द्या - बाजीराव ढाकणे यांची सरकारला मागणी

बीड/प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात मागील दहा दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले असून,उभ्या पिकांचा पूर्णतः नाश झाला आहे.या पार्श्वभूमीवर महाएनजिओ फेडरेशन, महाराष्ट्र राज्याचे बीड जिल्हा समन्वयक तथा सामाजिक कार्यकर्ते श्री बाजीराव ढाकणे यांनी बीड जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना हेक्टरी किमान १ लाख रुपयांची तात्काळ आर्थिक मदत देण्याची मागणी केली आहे.

पिकांचे अमाप नुकसान - शेतकरी हवालदिल

श्री.बाजीराव ढाकणे यांनी सांगितले की, सोयाबीन,कापूस,मका, तुर,भुईमूग व भाजीपाला यांसारख्या पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. अनेक शेतकऱ्यांनी कर्ज काढून शेती केली होती,पण आता उभे पीक पूर्णपणे पाण्या खाली गेले आहे. शेतकरी हवालदिल झाला आहे.शासनाने अहवाल,पंचनामे व तपासण्यांच्या नावाखाली वेळ घालवू नये,तर तातडीने मदतीचा निर्णय घ्यावा.

आश्वासन नव्हे,प्रत्यक्ष कृती हवी

बाजीराव ढाकणे यांनी पुढे सांगितले की, शेतकऱ्यांच्या डोळ्यातील अश्रू पाहा. केवळ आश्वासनांनी पोट भरत नाही.बीड जिल्ह्यातील सर्व तालुके ओला दुष्काळग्रस्त घोषित करून हेक्टरी १ लाख रुपयांची मदत थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केली पाहिजे.दौरे व बैठकी पेक्षा प्रत्यक्ष कृती होणे आवश्यक आहे.

पूरस्थितीमुळे शेतकऱ्यांमध्ये अस्वस्थता

बीड जिल्ह्यातील अनेक तालुक्यांमध्ये पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे.शेतजमिनी जलमय झाल्या असून पिकांचे झालेले नुकसान आणि आर्थिक संकटामुळे शेतकरी आत्महत्येच्या उंबरठ्यावर पोहोचले आहेत.अशा वेळी शासनाने



तात्काळ उपाययोजना न केल्यास परिस्थिती आणखी गंभीर होईल, असे मत श्री बाजीराव ढाकणे यांनी व्यक्त केले आहे.

शेतकऱ्यांचा सरकारला इशारा

जर तात्काळ मदत मिळाली नाही,तर शेतकऱ्यांचा रोष रस्त्यावर येईल,असा स्पष्ट इशारा श्री. बाजीराव ढाकणे यांनी सरकारला दिला आहे. शेतकऱ्यांचा आवाज आता रस्त्यावरूनच सरकारपर्यंत पोहोचवावा लागेल, असेही त्यांनी ठामपणे सांगितले आहे.

## अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या व्यथा ऐकून खासदार डॉ. कल्याण काळे धावले जिल्हाधिकाऱ्यांकडे

## तातडीने मदतीची ठाम मागणी

जालना /प्रतिनिधी

१५ सप्टेंबर २०२५ पासून जालना जिल्ह्यात सुरू असलेल्या ढगफुटीसदृश पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून शेतकऱ्यांवर भीषण संकट कोसळले आहे.शहरातील अनेक भागांत पाणी साचल्याने नागरिकांचे हाल होत आहेत, तर ग्रामीण भागात शेतीपिके, जनावरे, घरे आणि मालमत्तेचे प्रचंड नुकसान झाले आहे. अनेक शेतकऱ्यांच्या शेतातील पिके पाण्याखाली गेली असून हातातोंडाशी आलेले पीक डोळ्यांसमोर वाहून जात असल्याने शेतकरी हताश झाले आहेत.या भीषण परिस्थितीची गंभीर दखल घेत खासदार डॉ. कल्याण काळे यांनी आज जालना जिल्हाधिकारी कार्यालयात भेट घेऊन शेतकरी आणि नागरिकांना तातडीने दिलासा द्यावा अशी ठाम मागणी



केली. यावेळी त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना स्पष्ट निर्देश दिले की प्रत्येक बाधित शेतकरी व नागरिकाचा पंचनामा तातडीने करण्यात यावा आणि शासनाकडे सविस्तर अहवाल पाठवून त्वरित मदतकार्य सुरू करावे.

खासदार कल्याण काळे यांनी संवाद साधताना सांगितले की अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या प्रत्येक शेतकरी व नागरिकाला न्याय मिळवून देण्यासाठी मी सातत्याने पाठपुरावा करणार आहे. शासनाने तत्काळ पावले उचलून शेतकऱ्यांच्या जखमेवर मदतीचा मलम लावला पाहिजे.

गेल्या काही दिवसांपासून शेतकरी चिंतेत असून पिकांचे झालेले नुकसान पाहून त्यांचा जीव टोकाला पोहोचत आहे. या स्थितीत खासदार डॉ.काळे यांची धावपळ शेतकऱ्यांसाठी दिलासा ठरत असल्याचे उपस्थितांमध्ये समाधान व्यक्त करण्यात आले.या भेटीच्या वेळी जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजाभाऊ देशमुख, कल्याणजी दळे, जे. प्रकाश चव्हाण, बबलू चौधरी, अजय बनकर, त्रिंबक पाबळे, कृष्णा पडूळ, लक्ष्मण मसलेकर, श्रीरंग कामटे, राम शिरसाठ, सोपान तिरुके, ज्ञानेश्वर इंगोले, विष्णू पाटील शेजुळ आदी

## वाघाळा येथील रास्तभाव दुकान निलंबित

**शिधापत्रिकाधारकांची लूट,अरेरावी,धान्य कमी देणे, जादा पैशाची मागणी; यांसारखे १० गंभीर दोष उघड**

**वाघाळा येथील सरपंच सुनील उध्दव कांगणे यांच्या पाठपुराव्याला यश**

**जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांची धडक कारवाई**

मंठा तालुक्यातील वाघाळा येथील शिधापत्रिकाधारकांना अक्षरशः लुटणाऱ्या रास्तभाव दुकानदारावर अखेर प्रशासनाचा चाबूक बसला. गावकऱ्यांच्या तक्रारींवरून व सरपंच सुनील उध्दव कांगणे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर जिल्हा पुरवठा अधिकारी सौ. सविता चौधर यांनी फैरचौकशी करून विठोबा नामदेव कांगणे यांच्या नावावरील रास्तभाव दुकान क्र.१७९ थेट निलंबित केले.

सरपंच व गावकऱ्यांच्या सततच्या तक्रारी, पंचनामे आणि तपासणी अहवालातून उघड झालेले दोष थक्क करणारे आहेत. दुकानात भावफलक नाही, साठा दाखवणारा तक्ता नाही, वेळा दर्शवणारा फलक नाही, दक्षता समितीची माहिती नाही. एवढ्यावरच थांबता न राहता दुकानदाराने शिधापत्रिकाधारकांना धान्य कमी दिले, काहींना धान्यच दिले नाही, पावत्या दिल्या नाहीत आणि जादा पैशाची मागणी करून अक्षरशः लूटमार केली. त्यातच अरेरावीची भाषा वापरून शिधापत्रिकाधारकांचा अपमान केल्याचेही तपासात स्पष्ट झाले.

दुकानदाराचा लेखी खुलासा असमाधानकारक ठरल्याने सुनावणीनंतर हा निर्णय घेण्यात आला.जनतेला न्याय देण्यासाठी प्रशासनाने सुनावणी घेऊन दुकानदाराचा लेखी खुलासा फेटाळला आणि कठोर कारवाई करत दुकान थेट निलंबित केले. आता पुढील



चौकशीसाठी तहसीलदार मंठा यांच्याकडे प्रकरण सोपविण्यात आले आहे. गावकऱ्यांचा सवाल : आम्हाला हक्काचे धान्य लुटणाऱ्यांवर अजून कठोर कारवाई कधी होणार?

## गोदावरी, सिंदफणा नदीकाठ व इतर नद्या काठच्या सर्व जमिनी बाधित क्षेत्र म्हणुन घोषित करा- उपसभापती श्रीहरी नाना मोरे

माजलगाव /प्रतिनिधी: तालुक्यामध्ये मागील दोन ते तीन दिवसांपासुन गोदावरी, सिंदफणा या दोन्ही नद्यांना पुर आला आहे. परिणामी या नदीकाठच्या शेतींचे प्रचंड नुकसान झाले असुन पुरूषोत्तमपुरी येथील गट नं. ५५६ मधील जनावरांचा गोठा, चारा, शेती उपयोगी साहित्य, अन्नधान्य व स्मशानभुमीच्या कामासाठी आणलेले साडेतिनशे पोते सिमेंटचे नुकसान झाले आहे. त्यामुळे शासनाने नद्या काठच्या सर्व जमिनी बाधित क्षेत्र म्हणुन घोषित करा अशी मागणी बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी नाना मोरे यांनी केली आहे.



तालुक्यातील गोदावरी, सिंदफणा यासह छोट्या मोठ्या ईतर नद्यांच्या शेजारी अनेक गावे वसलेली आहेत. या गावातील शेतक-यांची हजारो एकर शेती नद्यांच्या कडेला आहे. प्रतिवर्षी या नद्यांना पुर आला की या जमिनी मातीसह खरडुन जातात. त्यामुळे उभ्या पिकांसह शेतीचेही प्रचंड नुकसान होते आणि शेतक-यांची होणारी ही हानी सरकार भरून काढुच शकत नाही. त्यामुळे या नद्याकाठचा शेतकरी मोडला जातो. आज संकटात सापडलेला शेतकरी आर्थिक मदतीची मागणी तर करतच आहे परंतु माजलगाव तालुक्यातील गोदावरी नदीच्या किनारी असणा-या सर्व जमिनी या शासनाने बाधित क्षेत्र म्हणुन कायमच्या घोषित कराव्यात जेणेकरून दरवर्षी होणारी शेतक-यांची आर्थिक हानी व वाढती गरिबी, दारिद्रय दुर होण्यास मदत होईल. त्याचबरोबर पुरूषोत्तमपुरी येथील गट नं. ५५६ मधील संपुर्ण क्षेत्र गोदावरी नदीच्या पुराने व्यापल्याने जनावरांचे गोठे, चारा, शेती उपयोगी साहित्य, अन्नधान्य तसेच याठिकाणी स्मशानभुमीच्या कामासाठी आणण्यात आलेले साडेतिनशे सिमेंट पोते पुराच्या पाण्याने खराब झाले आहेत. तालुक्यातील डुब्बाथडी पासुन ते डाकेपिंपरी पर्यंत गोदावरी नदीकाठच्या तसेच सिंदफणा नदीकाठच्या सर्व गावांची यादी करून त्याचा सर्वे करून शासकीय अधिकारी, कर्मचा-यांनी पंचनामे करून तात्काळ शेतक-यांना आर्थिक मदत द्यावी अशी मागणी अशी मागणी उपसभापती श्रीहरी नाना मोरे यांनी केली आहे.

# मंत्री, आमदारांनो फोटो शेशन बंद करा

## संकटात सापडलेल्या शेतकर्यांना हेक्टरी एक लाख रूपये मदतीची करा



राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे तालुकाध्यक्ष अमर देशमुख यांनी केली तहसीलदारांकडे मागणी

अंबाजोगाई – महाराष्ट्रात परतीच्या पावसाने हाहाकार माजलविला असून यामुळे शेतकर्याच्या खरीप पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. अतिवृष्टीमुळे नुकसान झाले आहे. जमिनी खरडुन गेल्या आहेत. त्यांना तात्काळ मदत करण्या ऐवजी मंत्री व आमदारांचे सांत्वनपर फोटो शेशन चालु आहे. हे तात्काळ थांबवा अडचणीत सापडलेल्या शेतकर्यांना मदत करा अशी मागणी शरद पवार गटाचे अंबाजोगाईचे तालुकाध्यक्ष अमर देशमुख यांनी तहसीलदार विलास तरंगे यांच्याकडे केली आहे.

राज्य सरकारने ढगफुटी असणार्या मंडळामध्येच मदत जाहिर केली आहे. परंतु प्रत्येक तालुक्यामध्ये ढग फुटी सदृष्य वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे शेतकर्यांचे खरीपाचे पिक वाहुन गेले आहे. खरीपाचे पिक वाहून गेले असले तरी जमीन खरडुन गेल्या आहेत. त्यामुळे शेतकर्यांना ही जमीन कसण्यासाठी किमान ५० हजारांची गरज आहे. त्यामुळे राज्य सरकारने हेक्टरी एक लाख रूपयांची मदत करावी अशी मागणी शेतकर्यातून होत आहे.

या मागणीत अंबाजोगाई तालुक्याला ओला दुष्काळ जाहिर करावा, शेतकर्यांसाठी हेक्टर एक लाख रूपयांची तातडीने मदत करावी, पाण्यामुळे खरडुन गेलेल्या शेतीसाठी प्रति हेक्टर वीस लाख रूपयांची मदत करावी जेणे करून शेत जमीन पुन्हा लागवडी योग्य करता येईल, नुकसान ग्रस्त शेतकर्यांची कृषी कर्ज व इतर कर्ज सरसगट माफ करावेत, आणि शेतकर्यांना सरसकट विमा मंजुर करावा, पुराच्या पाण्यात वाहुन गेलेल्या व मृत्यू मुखी पडलेल्या जनावरांच्या पंचनाम्याची अट शिथील करून त्यांना तातडीने मदत करावी अशा मागण्या तहसीलदारांकडे निवेदनाद्वारे शेतकर्यांकडे केल्या आहेत.

या निवदेनावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष अमर देशमुख, अ‍ॅड.ईस्माईल गवळी, अंकुश ढोबळे, संजय काळे, बालासाहेब कदम, रविंद्र मोरे, हमीद चौधरी, शेख इरफान, गणेश घाडगे, मारूती घाडगे, बाबुराव घाडगे, शेख आय्युब शेख मुस्ताक, तानबा लांडगे, भगवान ढगे, सुधाकर जोगदंड, व्यंकट मुंडे, करण देशमुख, पवन देशमुख, राहुल सिरसट, हाजी बागवान, पवन किर्दंत, यशोधन लोमटे, रमेश आडे, अनिकेत सोमवंशी, अमोल देशमुख आदी शेतकर्यांच्या स्वाक्षर्या आहेत.

तातडीची मदत न मिळाल्यास पुढार्यांनी फोटो सेशन करू नये

अंबाजोगाई तालुक्यात मोठ्या प्रमाणावर परतीच्या पावसाने शेतकर्याचे मोठे प्रमाणावर नुकसान झाले असून हाता तोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरवलेला आहे. त्यामुळे शेतकरी मोठ्या अडचणीत सापडला असून त्याला आत्महत्या करण्या शिवाय पर्याय नाही. त्यामुळे राज्य सरकारने सरसगट हेक्टर एक लाख रूपयांची मदत करावी. अन्यथा अंबाजोगाई तालुक्यात पांढर्या कपड्यातील पुढार्यांना फिरू देणार नाही. – अमर देशमुख, तालुकाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट



## जिल्हास्तरीय शालेय बॉल बॅडमिंटन स्पर्धेत जि प कन्या प्रशालेचे यश

अंबाजोगाई (प्रतिनिधी):- अंबाजोगाई शहरात नुकत्याच जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा संपन्न झाल्या. या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत शालेय बॉल बॅडमिंटन स्पर्धेत जिल्हा परिषद कन्या प्रशालेतील विद्यार्थिनींनी घवघवीत यश संपादन केले. या स्पर्धेत जिल्हाभरातुन अनेक शाळा व शालेय विद्यार्थी व विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त असा सहभाग नोंदवला होता. खोलेश्वर महाविद्यालय अंबाजोगाई येथे नुकत्याच पार पडलेल्या जिल्हास्तरीय शालेय बॉल बॅडमिंटन स्पर्धेत जि प कन्या प्रशाला अंबाजोगाईच्या १४ वर्षे वयोगट व १७ वर्षे वयोगटामधील मुलींच्या संघाने जिल्ह्यात सर्वद्वितीय येऊन यश संपादन केले आहे. या स्पर्धेमध्ये ग्रामीण भागासकट काळवटी तांडा, परळीवेस, रविवार पेठ येथील अत्यंत गरीब व होतकरू मुली सहभागी झाल्या होत्या . या विद्यार्थीनींना कसल्याही प्रकारच्या शालेय क्रीडा सोयी सुविधा नसतांना तसेच अत्यंत अपुऱ्या खेळाच्या साहित्याच्या माध्यमातून खेळाडूंनी हे यश मिळवले आहे. या स्पर्धेत सर्व सहभागी तसेच विजेत्या खेळाडूंना शाळेचे क्रीडा शिक्षक तथा तालुका क्रीडा समन्वयक दत्ता देवकते , श्रीमती कुलकर्णी मॅडम, श्रीमती जाधव यांचे मार्गदर्शन लाभले आहे. या यशाबद्दल सर्व यशस्वी खेळाडूंचे गटशिक्षणाधिकारी मधुकर सुवर्णकार , शाळेचे मुख्याध्यापक एस जी चाटे , शिक्षक मैत्री प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय दादा रापतवार ,सचिव विष्णू बप्पा सरवदे, व शाळेतील सर्व शिक्षक वृंद यांनी अभिनंदन करत पुढील विजयी स्पर्धकांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



आष्टीचे माजी सभापती ड. साहेबराव म्हस्के यांचे बंधु माजी सरपंच पैलवान हौसराव बाजीराव म्हस्के यांच्या दशक्रियाविधी निमित्त माजी आ. भीमराव धोंडे साहेब यांनी श्रध्दांजली अर्पण केली.

## शाहू माध्यमिक विद्यालयात शैक्षणिक साहित्य वाटप करुन केला

## राष्ट्रीय चर्मकार महासंघाचा वर्धापन दिन साजरा नानासाहेब घोडके

राष्ट्रीय चर्मकार महासंघ शाखा माजलगाव वतीने शाहु माध्यमिक विद्यालय पात्रुड येथे शैक्षणिक साहित्य व विद्यार्थ्यांना खाऊ वाटून राष्ट्रीय चर्मकार महासंघाचा तीसवा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला या कार्यक्रमाची सुरुवात महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करून माणिक राधाकिसन घोडके यांना श्रद्धांजली अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली या कार्यक्रमाचे उद्घाटक कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव मा हरिभाऊ सावने, कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून व्यापारी महासंघ तालुका अध्यक्ष सुरेंद्र रेदासानी तर तर प्रमुख पाहुणे म्हणून महादेव सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष मा सितारामजी सोनवणे व राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे जिल्हा अध्यक्ष नानासाहेब घोडके तसेच युवा जिल्हाध्यक्ष राजेश अण्णा जाधव तालुकाध्यक्ष सुभाष कांबळे



कार्यक्रमासाठी उपस्थित होते या कार्यक्रमाचे विशेष सत्कारमूर्ती म्हणून रोटरी क्लब ऑफ माजलगाव यांच्या वतीने आदर्श शिक्षक पुरस्कार मिळालेले श्री वाडेकर सर यांचा महासंघाच्या वतीने सत्कार करण्यात आला

या कार्यक्रमाचे उद्घाटक श्री हरिभाऊ सावने यांनी आपल्या भाषणामध्ये श्री संत गुरू रविदासांचे विचार तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे योगदान याबद्दल मार्गदर्शन केले तसेच जिल्हाध्यक्ष नानासाहेब घोडके यांनी राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या उभारणीमध्ये महासंघाचे संस्थापक अध्यक्ष बबनरावजी घोलप साहेब यांच्या कार्याचा उल्लेख करत तळागाळातील लोकांना गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल व विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा समाज कल्याण विभागाच्या मार्फत उपलब्ध करून दिल्याचे विवेचन आपल्या भाषणामध्ये प्रस्ताविकामध्ये नानासाहेब घोडके यांनी केले, अध्यक्ष भाषणामध्ये सुरेंद्र रेदासानी यांनी राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या सामाजिक कार्यातील योगदानाबद्दल व आदरणीय बबनराव घोलप यांच्या कार्याला उजाळा देताना सर्व समाजाने एकत्रितरित्या येऊन समाज चळवळीमध्ये योगदान देण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले

यावेळी सत्काराला उत्तर देताना आदर्श शिक्षक श्री अशोक वाडेकर बोलताना म्हणाले राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय बबनराव घोलप साहेब यांनी अतिशय कष्टातून ही संघटना स्थापन केली असून या संघटनेचे रोपट राज्यातील गावागावापर्यंत पोहोचण्याचा कार्य कार्यकर्ता म्हणून आपण सर्वांनी केले पाहिजे आदरणीय बबनरावजी घोलप साहेब यांचे स्वप्न साकार करण्याचे काम आपण सर्वांनी केले पाहिजे. या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय चर्मकार महासंघ शाखा माजलगाव यांच्या वतीने ३०० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊ वाटप करून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन पर गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र सन्मानचिन्ह व पुष्पहार देऊन सन्मानित करण्यात आले या कार्यक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक श्री मात्रे बीके, विश्वशांती आश्रम शाळेचे मुख्याध्यापक श्री शिंदे व्हि आर ,सावित्रीबाई फुले प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक सचिन वाघमारे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गिन्यानदेव नावडकर, तालुका उपाध्यक्ष अर्जुन पोहेकर, जिल्हा संघटक राधाकीसन भाळशंकर, भाजपा तालुका सरचिटणीस संतोष जाधव व शाहू विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी कार्यक्रमाचे वेळी उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री जगताप आर एम यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार श्री वडचकर सर यांनी मानले

## शेतकऱ्यांच्या व्यथांची जाणीव आहे..एका गुंठ्याचा पंचनामा राहणार नाही..जलसंपदा मंत्री राधाकृष्ण पाटील यांची ग्वाही

### आ.सुरेश धस यांनी मांडल्या शेतकऱ्यांच्या व्यथा..

आष्टी – (प्रतिनिधी) अतिवृष्टीमुळे प्रचंड प्रमाणात नुकसान झालेच आहे..परतु शासन खंबीरपणे आपल्या पाठीशी आहे..शेतकऱ्यांच्या व्यथांची जाणीव आहे..मतदारसंघातील एकही गुंठ्याचा नुकसानीबाबत पंचनामा राहणार नाही..याची आमदार सुरेश धस यांचे साक्षीने ग्वाही देतो ..असे प्रतिपादन राज्याचे जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

आष्टी तालुक्यातील अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी शेतकऱ्यांच्या बांधावर आलेल्या जलसंपदा मंत्री ना राधाकृष्णजी विखे पाटील यांनी अहिल्यानगर आणि बीड जिल्ह्यातील गेल्या आठ दिवसांमध्ये झालेल्या अतिवृष्टी व ढगफुटीमुळे निर्माण झालेल्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी आले..असता त्यांनी आमदार सुरेश धस यांच्या समवेत या सर्व नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली.

आष्टी तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे पिकांचे, घरांचे, गावचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, खडकत येथील सीना नदीला पूर आल्याने झालेल्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी आमदार सुरेश धस यांनी नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांच्या व्यथा मंत्री विखे



पाटील यांचे समोर आणल्या यावेळी ना. विखे पाटील म्हणाले, मी तुमच्या नुकसानीची पाहणी करण्यासाठीच इथे आलो आहे. मी एक – दोन ठिकाणी जात असलो तरी त्यामुळे संपूर्ण तालुक्यातील यंत्रणा कामाला लागेल. सरकारी यंत्रणेकडून कोणी चुकलं असेल तर आता ते कामाला लागेल. तुमचा रोष असणं साहजिक आहे, कारण ज्याचं जळतं त्याला कळतं. तुम्ही व्यथा मांडत आहात आणि तुमची चिंता योग्य आहे. मात्र, तुमच्या तालुक्यातील आणि गावातील एकाही गुंठ्याचा पचनामा राहणार नाही, याची मी हमी देत असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी आमदार सुरेश धस यांनी शेतकऱ्यांना आश्वस्त करत सांगितले की, आष्टी व कर्जत जामखेड तालुक्याच्या हद्दीत असलेल्या मौजे खडकत येथे कोल्हापूर पद्धतीच्या बांधऱ्याचा भराव फूटून शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीचा आढावा घेत माहिती दिली. आष्टी मतदार संघातील जलसंपदा विभागाचे धिर्डी, निमगाव चो., हिंगणी, टाकळसिंग, सांगवी, आष्टी, खडकत को. प. बंधारा यांसह इतर साठवण तलाव, मध्यम प्रकल्प व कालव्यांच्या झालेल्या नुकसानीबाबत सविस्तर माहिती दिली. आपल्या विभागाच्या माध्यमातून तातडीने दुरुस्ती करून रब्बी हंगामासाठी पाणी साठवण्याची विशेष आर्थिक तरतूद करण्याची विनंती केली.

मेंढरं, गुरं वाहून गेली असतील किंवा ज्या घरांची पडझड झाली असेल त्यासाठी नुकसानभरपाई दिली जाईल. ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यातील पंचनाम्यांचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. महसूल आणि कृषी विभाग काम करत आहेत. त्यामुळे काळजी करु नका, तुम्हाला मदत मिळेल. नुकसान भरपाई देण्याचे काम सुरु आहे आणि कोणताही शेतकरी किंवा गावकरी मदती पासून वंचित राहणार नाही याची खबरदारी मी लोकप्रतिनिधी म्हणून माझी असल्याचे आ.धस यांनी सांगितले.

यावेळी गणेश शिंदे, माजी सभापती दत्ता जेवे, भाजपा तालुकाध्यक्ष रमेश गावडे, शांतिलाल काटे, ललित जेवे, बाळासाहेब पवार, प्रदीप मोरे, बाळासाहेब भोष्टे, संदीप खेडकर सरपंच, विनोद खेडकर, प्रवीण झांबरे, संजय पवार, संजय जेवे, ज्ञानेश्वर भोसले मेजर, निशांत जेवे, गणेश जेवे यांच्यासह या प्रसंगी जलसंपदा विभाग, बीडचे अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, उप अभियंता खडकत, टाकळसिंग, हिंगणी, सांगवी, आष्टी येथील शेतकरी व नागरिक उपस्थित होते.



## रासेयो म्हणजे सामाजिक जाणीव जागृत करण्याचे प्रभावी माध्यम– डॉ. स्वानंद कुलकर्णी

माजलगाव /प्रतिनिधी : राष्ट्रीय सेवा योजना म्हणजे सामाजिक जाणीव जागृत करण्याचे प्रभावी माध्यम असल्याचे प्रतिपादन प्रसिद्ध नेत्ररोग तज्ञ डॉ. स्वानंद कुलकर्णी यांनी केले.

सिद्धेश्वर महाविद्यालय रासेयोज विभाग व आजीवन शिक्षण विस्तार सेवा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने साळेगाव येथे आयोजित महिला आरोग्य शिबिराच्या उद्घाटनात बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी हे तर एम.डी. मेडिसिन तज्ञ डॉ. प्रताप लेंडाळ, बालरोग तज्ञ सौ. श्रद्धा लेंडाळ, स्त्री रोग तज्ञ डॉ. अंजली अकोलकर, दंतरोग तज्ञ डॉ. प्रतीक पोतदार, सरपंच प्रशांत राठोड, ग्रामसेवक श्री. कावळे, द

वगिरी अर्बनचे दीपक कदम उपस्थित होते. पुढे बोलताना ते म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजना ही सामाजिक एकात्मतेने काम करणारी व विद्यार्थ्यांना सतत सामाजिक जाणीव जागृत करून देणारी एक संघटन आहे. अशा माध्यमातून आज आपण येथे महिलांचे आरोग्य शिबिर घेऊन त्यांच्या वेगवेगळ्या रोगाविषयी निदान करून मोफत उपचार व मार्गदर्शन करणार आहोत. डॉ. प्रताप लेंडाळ म्हणाले की, समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो समाजाचे ऋण फेडायचे असेल तर असे सामाजिक उपक्रम घेऊन समाजातील लोकांना सेवा देण्याचे काम आम्ही या माध्यमातून करणार आहोत. डॉ. अंजली अकोलकर, दीपक कदम

यांनी मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजना ही माझ्यासाठी नाही तर समाजासाठी छीं ाश ईीं ीें हे ब्रीद घेऊन चालणारे संघटन आहे. विद्यार्थ्यांना सोबत घेऊन आपल्याला समाजासाठी काहीतरी करावयाचे आहे. समाजसेवेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांवर संस्कार करण्याचे कार्य हे संघटन करते. प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ.शिवशंकर मिटकरी यांनी केले तर सूत्रसंचालन डॉ.ज्ञानेश्वर गवते यांनी तर आभार प्रा. अशोक होके यांनी मानले. कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. युवराज मुळये, डॉ. बालासाहेब मुंडे, डॉ. गोरक्षनाथ फसले, डॉ. प्रेम राठोड, श्री. दीपक घोडके तसेच गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




कलासाधक मंच माजलगावच्या वतीने नवरात्री उत्सवाच्या निमित्ताने तुळजाभवानी मंदिर माजलगाव येथे प्रतिदिन सुरेख रांगोळी काढण्यात येते.त्या पैकी आजची छान सुंदर रांगोळी चा फोटो.

## पाटोदेकरांना पुन्हाआला प्रत्यय जिथे विषय गंभीर तिथे नगरसेवक आसिफशेठ सौदागर, श्रीहरी गीते खंबीर



पाटोदा (प्रतिनिधी) पाटोद्यात पावसामुळे आलेल्या मांजरानदीला पुराने नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले. शहरातील अनेक वस्त्यांमध्ये पाणी शिरून घरगुती वस्तूंचे नुकसान झाले,यामुळे नागरिकांना हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या अचानक उभ्या राहिलेल्या या संकटामुळे पुरग्रस्त नागरिकांमध्ये भीती व चिंतेचे वातावरण निर्माण झाले असताना अशा गंभीर परिस्थितीत नगरसेवक आसिफशेठ सौदागर व नगरसेवक श्रीहरी बापू गीते तातडीने पुरग्रस्त भागात दाखल झाले. त्यांनी परिस्थितीचा आढावा घेत नागरिकांशी थेट संवाद साधला व त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. जनतेच्या अडचणी हीच आमची जबाबदारी असे सांगत त्यांनी लोकांना धीर दिला.यावेळी नगरसेवक सौदागर व गीते यांनी फक्त आश्वासन न देता प्रत्यक्ष कृती दाखवत पुरग्रस्तांसाठी नाष्टा, चहा व जेवणाची सोय करून दिली. संकटसमयी मिळालेल्या या मदतीमुळे नागरिकांमध्ये दिलासा व समाधानाची भावना निर्माण झाली.नगरसेवकांच्या या कार्यतत्परतेचे नागरिकांनी स्वागत केले असून, खऱ्या अर्थाने लोकप्रतिनिधी म्हणजे असे अशी प्रतिक्रिया पुरग्रस्तांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

# शहरातील महिलांच्या आर्थिक सशक्तीकरनाचा पाया सावित्रीमाई महिला पतसंस्थेच्या माध्यमातून रचला जात आहे- अध्यक्षा सुनीता मोदी



## क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले महिला ना सह पतसंस्थेची १० वी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न, पतसंस्थेस मार्च २०२५ अखेर ३ लाखांचा निव्वळ नफा

अंबाजोगाई (प्रतिनिधी):- क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले महिला नागरी सहकारी पतसंस्थेच्या माध्यमातून शहरातील महिलांच्या आर्थिक सशक्तीकरनाचा पाया रचला जात आहे. दैनंदिन जीवनात महिलांची आर्थिक उन्नती होऊन त्यांचे जीवनमान उंचावत असल्याचा आनंद क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले महिला नागरी सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षा सौ. सुनीता राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केला. त्या पतसंस्थेच्या सन २०२४-२०२५ सालच्या १० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत संस्थेचा आर्थिक अहवाल सादर करत होत्या. यावेळी पतसंस्थेच्या सचिव खडकभावी शोभा बाबू , तसेच उपाध्यक्षा डॉ. धाकडे राजश्री राहुल , मसने उषा गणेश, मस्के अंजली विष्णुपंत , सविता विजय रापतवार , सरवदे संगीता विष्णू, फारोखी परवीन नुजहत , खंडाळे सुरेखा बाबुराव, चोकडा जमुना जयप्रकाश , रुपाली सुधीर धर्मपात्रे, सायली सुहास मोहिते या संचालिकांसह शाखा व्यस्थापक सागर कंगळे हे उपस्थित होते.पतसंस्थेच्या २०२४-२५ सालच्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सुरुवात अंबाजोगाई वासीयांचे आराध्यदैवत श्री योगेश्वरी देवी तसेच सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर पतसंस्थेचे व्यवस्थापक सागर कंगळे यांनी संस्थेच्या मागील वर्षाचा इतिवृत्त सादर केला. ज्यामध्ये संस्थेच्या आर्थिक वर्षातील विविध विषयांवर चर्चा घेवून त्यांना मान्यता मिळवली. तसेच मा अध्यक्षांच्या अनुमतीने ऐनवेळी आलेल्या विषयांवर चर्चा करण्यात आली.

पतसंस्थेचा वार्षिक अहवाल अध्यक्षा सौ. सुनीता राजकिशोर मोदी यांनी सादर केला . आपल्या देशाची संस्कृती ही पुरुष प्रधान संस्कृती आहे . यामुळे समाजात बहुतांश वेळी महिलांना दुय्यम स्थान देताना दिसून येत आहे. याचाच परिणाम म्हणून बहुतांश महिला घर, चूल आणि मूल यामध्येच गुरफटून पडलेली आढळून येत असते. कुटुंबात तसेच दैनंदिन व्यवहारात महिलांना आर्थिक स्वायत्तता नसते. हीच बाब हेरून साधारणपणे १० वर्षा पूर्वी राजकिशोर मोदी व सौ सुनीता मोदी यांनी केवळ महिलांनी महिलांसाठीच चालवावी अशा क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले महिला पतसंस्थेची मुहूर्तमेढ रोवली. या पतसंस्थेमुळे महिलांना काही प्रमाणात का होईना आर्थिक स्वायत्तता मिळून त्यांचा व कुटुंबाचा आर्थिक स्तर उंचावत असल्याचे दिसून आले. त्यामुळेच अध्यक्षा सुनीता मोदी यांनी सावित्रीमाई फुले महिला पतसंस्थेच्या माध्यमातून शहरातील आर्थिक सशक्तीकरनाचा पाया रचला गेला आहे असा आनंद सुनीता मोदी यांनी या वार्षिक सर्वसाधारण सभेप्रसंगी व्यक्त केला. या सभेदरम्यान पतसंस्थेच्या उत्कृष्ट ग्राहक महिलांचा सन्मान व सत्कार पतसंस्थेच्या अध्यक्षा व संचालिका यांच्या हस्ते भेटवस्तू देऊन करण्यात आला.पतसंस्थेची आर्थिक स्थिती विशद करताना त्यांनी ३१ मार्च २०२५ अखेर पतसंस्थेच्या सभासदांची संख्या ही २३१५ एवढी असल्याचे सांगितले . तसेच संस्थेचे भागभांडवल हे रुपये २५ लाख एवढे जमा असल्याचे नमूद केले .३१ मार्च २०२५ अखेर पतसंस्थेकडे ५ कोटी च्या ठेवी जमा झाल्या असून त्यामधून समाजातील गरजवंत महिलांना ३ कोटी रुपये कर्जाचे वितरण करण्यात आल्याचे पतसंस्थेच्या अध्यक्षा सुनीता मोदी यांनी सांगितले. अंबाजोगाई पिपल्स बँकेत सावित्रीमाई फुले पतसंस्थेने ०३ कोटी रुपयांची गुंतवणूक केली आहे . त्याच बरोबर ३१ मार्च २०२५ अखेर पतसंस्थेस ०३ लाखाचा नफा झाल्याचे देखील अध्यक्षा सौ. सुनीता मोदी यांनी सांगताना झालेल्या नफ्यातूनच पतसंस्थेच्या सर्व सभासदांना ७% लाभांश देण्याचे याप्रसंगी जाहीर केले. पतसंस्था करत असलेल्या आर्थिक उन्नती चे सर्वस्वी श्रेय हे पतसंस्थेचे संस्थापक तथा मार्गदर्शक राजकिशोर मोदी यांच्यासह पतसंस्थेच्या सर्व संचालिका, ठेवीदार ,सभासद आणि महिलांनी घेतलेल्या कर्जाचा वेळेवर परतावा यालाच द्यावे लागेल असेही सौ.मोदी म्हणाल्या. आजमितीला संस्थेत सागर कंगळे शाखा व्यवस्थापक , सचिन काशीद व अनिल काळे हे ०३ कर्मचारी तसेच ०१ नित्य निधी ठेव प्रतिनिधी असून ते देखील संस्थेच्या कामात मोलाचा वाटा उचलत असल्याचे अध्यक्षा सुनीता राजकिशोर मोदी यांनी याप्रसंगी सांगितले. या वार्षिक सर्वसाधारण सभेतील उपस्थित सर्व संचालिका, सभासद,व खातेदारांचे आभार उपाध्यक्षा खंडाळे सुरेखा यांनी व्यक्त केले. या वार्षिक सर्वसाधारण सभेस क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले महिला पतसंस्थेचे अनेक सभासद , ग्राहक तथा हितचिंतक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.



# राष्ट्रवादी ओबीसी सेल च्या केज तालुकाध्यक्ष पदी गोविंद ससाणे यांची निवड

केज/प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या ओबीसी सेलचे केज तालुकाध्यक्ष म्हणून सोनिजवळा गावचे सरपंच पती गोविंद ससाणे यांची नुकतीच नियुक्ती झाली. यानिमित्त आयोजित पत्रकार परिषदेत त्यांचा सत्कार करण्यात आला व शुभेच्छा देण्यात आल्या.पत्रकारांशी बोलताना गोविंद ससाणे यांनी शासनाने जाहीर केलेल्या यादीत केवळ तीन मंडळांचा समावेश केल्याचे सांगितले.मात्र पूर्ण केज तालुक्यात अतिवृष्टी झालेली असल्यामुळे संपूर्ण तालुका यामध्ये समाविष्ट करावा,अशी मागणी त्यांनी केली. तसेच गावातील सामाजिक सलोखा बिघडलेला असून तो टिकवण्यासाठी काम केले तरच गावाचा विकास साध्य होईल, असे मत त्यांनी व्यक्त केले.दरम्यान,ओला दुष्काळ जाहिर करावा, अशी मागणी रमेशराव आडसकर यांच्या मार्फत शासनाकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.नदी काढच्या शेतातील विहिरी पूर्ण पणे गाळाने भरल्या असून त्या वीहीरीसाठी अनुदान देण्यात यावे, आर्थिक विकास मंडळाच्या योजना अठरापगड जातींपर्यंत तळागाळात पोहोचविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन गोविंद ससाणे यांनी दिले.तसेच पक्षाने मला राष्ट्रवादी ओबीसीसेलचे नेतृत्व करण्याची संधी दिली त्या बद्दल उप मुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार,प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे जेष्ठ नेते रमेशराव आडसकर यांचे देखील त्यांनी आभार मानले आहेत.

# सरसकट शेतकऱ्यांना १० हजार रुपये आर्थिक मदत द्यावी – माजी आ.भीमराव धोंडे

## नुकसानग्रस्तांच्या मदतीसाठी माजी आ.भीमराव धोंडे देणार १ महिन्याची ८० हजार पेन्शन

आष्टी - (प्रतिनिधी) आष्टी विधानसभा मतदार संघातील २१ महसूल मंडळात अतिवृष्टीमुळे एक लाख एकरावरच्या पिकांचं मोठे नुकसान झाले असून जमिनी खरडुन गेल्या आहेत. पिके पाण्याखाली गेली, घरे पाण्याखाली गेली व पशुधन दगावले ४ ते ५ नागरीकांचा मृत्यू झाला. सर्वच मंडळात अतिवृष्टी झाली आहे. शेतक-यांचा दिवाळी पूर्वी शिमगा झाला आहे. बळीराजाची आयुष्यभराची कमाई या पुराने वाहुन गेली आहे. माझ्या आयुष्यात पहिल्यांदाच आमच्या भागात पावसाने थैमान घातलेले पाहिले आहे. या बळीराजाला उभारी देण्यासाठी दिवाळी पूर्वी ज्या संपुर्ण जमिनी वाहून गेल्या आहेत त्यांना हेक्टरी दोन लाख रूपये मदत, फळबागांना हेक्टरी ५० हजार रुपये इतर पिकांना हेक्टरी १७ हजार रुपये बुजलेल्या विहीरींना ५ लाख रुपये २ हेक्टर अट रद्द करुन जेवढा सातबारा तेवढा मावेजा, मयत व्यक्तीच्या वारसांना १० लाख रुपये मदत तात्काळ देण्याची मागणी माजी आ. भीमराव धोंडे यांनी केली.

आष्टी येथील भगवान महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत केली. यावेळी त्यांनी नुकसानग्रस्त भागातील नागरिकांना मदत म्हणून १ महिन्याची पेन्शन देणार असल्याचे सांगितले. पुढे बोलताना माजी आ. भीमराव धोंडे म्हणाले की, आष्टी विधानसभा मतदार संघातील २१ महसूल मंडळात मी पाहणी केली असता अतिवृष्टीमुळे एक लाख एकरापेक्षा जास्त पिकांचं अंदाजे ४०० ते ५०० कोटी रु. चे नुकसान झाले असल्याचा अंदाज आहे. ज्या संपुर्ण जमिनी वाहून गेल्या आहेत त्यांना



हेक्टरी दोन लाख रूपये मदत तर ज्या शेतकऱ्यांच्या विहीरी बुजल्या आहेत त्यांना पाच लाख रुपये अनुदान द्यावे, फळबागेसाठी २२ हजार रुपये मावेजा दिला जातो तो तुटपुंजा असून ५० हजार रुपये हेक्टरी फळबागेसाठी व तर इतर पिकांना ८ हजार ५०० रुपये सरसकट ऐवजी १७ हजार रुपये मावेजा हेक्टरी द्यावा, दोन हेक्टरची अट रद्द करून शेतकऱ्याचा जेवढा सातबारा आहे तेवढा मावेजा देण्यात यावा इतर राज्यांमध्ये ही अट नसून आपल्या कडेही इतर राज्यांप्रमाणे जेवढा सातबारा तेवढा मावेजा द्यावा. गाई म्हशींना दिला जाणारा मावेजा तुटपुंजा असून एक गाई असो किंवा म्हैस, बैल प्रत्येकी ७५ हजार रुपये मदत तर शेळी साठी प्रत्येकी १५ हजार रुपये मदत द्यावी तसेच अतिवृष्टीमुळे मृत्यू झालेल्या शेतकऱ्याच्या वारसाला तात्काळ शासनाने १० लक्ष रुपये मदत देण्यात यावी तसेच आष्टी मतदार संघात पुरग्रस्त स्थिती असून आणखी मोठ्या प्रमाणावर पाऊस पडत आहे. शासनाने नुकसान ग्रस्त भागाचे पंचनामे करण्यात वेळ घालण्यापेक्षा दिवाळीपूर्वी सर्व शेतकऱ्यांना मदत द्यावी व राज्यात ओला दुष्काळ जाहीर करावा व अतिवृष्टीचा इशारा असलेल्या भागात जीवित आणि वित्तहानी रोखण्याच्या दृष्टीनं ठोस पावलं उचलावेत असंही मा. आ. भीमराव धोंडे यांनी सांगितले आहे.

नुकसान ग्रस्तांच्या मदतीसाठी माजी आ. भीमराव धोंडे यांनी दिली ५ वेळा पेन्शन

मतदार संघात ज्या ज्या वेळेस आपत्ती आली त्यावेळ माजी आ. भीमराव धोंडे यांनी सामाजिक बांधिलकी जोपासत नुकसानग्रस्तांना मदत व्हावी यासाठी आमदार असताना पगार व माजी आमदार असताना पेन्शन अशाप्रकारे ५ वेळा मदत केली आहे. सद्यस्थितीत होत असलेल्या अतिवृष्टीने नुकसान ग्रस्तांना मदत व्हावी यासाठी १ महिन्याची ८० हजार रुपये पेन्शन जिल्हाधिकारी यांच्याकडे १ ते २ दिवसांत सुपूर्द करणार आहेत.

# सकारात्मक विचार जीवनासाठी आवश्यक मानसोपचारतज्ज्ञ डॉ राजेश इंगोले

अंबाजोगाई (प्रतिनिधी) सकारात्मक विचार जीवनासाठी आवश्यक आहेत, युवकांनी सतत चांगल्या विचारांतून प्रगतीच्या वाटेवर पुढे जाण्याचा प्रयत्न केला पाहिजे असे प्रतिपादन प्रसिद्ध मानसोपचारतज्ज्ञ, सामाजिक कार्यकर्ते डॉ. राजेश इंगोले यांनी केले.येथील स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मानसोपचारतज्ज्ञ डॉ. राजेश इंगोले प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.आपल्या प्रेरणादायी भाषणांतून युवकांनी आपले ध्येय निश्चित केले पाहिजे व ते साध्य करण्यासाठी अविश्रांत परिश्रम घेतले पाहिजेत असे मत व्यक्त केले. तरुणांनी व्यसनांच्या आहारी न जाता आपला उत्कर्ष साधला तरच समाजाचा पर्यायाने राष्ट्राचा विकास होवू शकतो . तरुण मनाने



खंबीर असेल, प्रयत्नशील असेल तर यशाला गवसणी घालू शकतो असे मत डॉ. राजेश इंगोले यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान योगेश्वरी शिक्षण संस्थेचे जेष्ठ सल्लागार, महाविद्यालयाचे विभाग प्रमुख प्रा. माणिकराव लोमटे यांनी भूषविले आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी एन.एस.एस.मध्ये सक्रीय सहभागी व्हावे असे आवाहन केले. व्यक्तीमत्वाच्या सर्वांगीण विकासासाठी राष्ट्रीय सेवा योजना हे एक चांगले व्यासपीठ आहे असे मत त्यांनी व्यक्त केले.

एन.एस. एस. दिनाच्या निमित्ताने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत देशमुख यांनी मार्गदर्शन केले. महाविद्यालयामध्ये उपलब्ध असलेल्या सर्व सेवा सुविधांचा लाभ घ्या असे आवाहन प्राचार्यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एन एस एस कार्यक्रमाधिकारी डॉ. किरण चक्रे यांनी केले तर आभार प्रदर्शन कार्यक्रमा धिकारी . प्रो. डॉ.शैलजा बरुरे यांनी केले.

या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉक्टर रमेश सोनटक्के तसेच गुणवत्ता हमी मंडळाचे सहसंचालक डॉ. ज्ञानेश्वर वडजे,एन.एस.एस. कार्यक्रमाधिकारी डॉ. ज्ञानेश्वर सोनवणे, महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




कवडगावथडी ता.माजलगाव येथील माजी सरपंच वैजेनाथराव तौर यांचे मागील काही दिवसापूर्वी दुःखद निधन झाले असता आज त्यांचा कुटुंबियांची भेट घेऊन सांत्वन करताना माजी सभापती नितीनदादा नाईकनवरे.यावेळी सोबत बाजार समिती संचालक भगवान नाना आगे,शेलापुरी सरपंच गणेशराव शेंडगे,लहू तांबे व उवस्थित सर्व.

# ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रूपये आर्थिक मदत करा - राजेसाहेब देशमुख

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

बीड जिल्ह्यासह अंबाजोगाई आणि परळी वैजनाथ तालुक्यात मागील काही दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यात पुन्हा-पुन्हा मुसळधार पाऊस पडत आहे. एकीकडे पावसाचे पाणी तर दुसरीकडे धरणातून सोडण्यात येणारा पाण्याचा विसर्ग त्यामुळे डोंगर पट्टा व नदीकाठच्या पिकांचे, शेतीचे, घरांचे, पशुधनाचे, पाळीव प्राणी, अनेकांच्या जिविताचे, शेतीपूरक साहित्य, राहती घरे, विहिरी, सोलार पॅनल, सोलार पंप, रस्ते, पुल, पाझर तलाव, साठवण तलाव यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. काही गावांचा संपर्क ही तुटला आहे. अनेक गावांत घरांत पाणी शिरल्यामुळे नागरिकांना रात्र जागून काढावी लागत आहे. अपरिमित हानी झाल्यामुळे नागरिक, शेतकरी हवालदिल झाले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेसाहेब देशमुख यांनी मागील काही दिवसांपासून अंबाजोगाई आणि परळी वैजनाथ तालुक्यात गावोगावी जाऊन नागरिक, शेतकऱ्यांना दिलासा दिला. तहसीलदार, महसूल, कृषी अधिकाऱ्यांना फोनवरून संपर्क साधून सरसकट पंचनामे करण्याची विनंती करून शेत जमीन खरवडली, पिके वाहून गेली,



त्यामुळे ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना तात्काळ प्रति हेक्टरी ५० हजार रूपये नुकसान भरपाई द्यावी, आर्थिक मदत करावी अशी मागणी केली आहे.

बुधवारी सकाळीच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेसाहेब देशमुख यांनी अंबाजोगाई तालुक्यातील माकेगाव, धानोरा खुर्द, तटबोरगाव, अंजनपूर, कोपरा, देवळा, आपेगाव आदी गावांतील पूरपरस्थिती जाणून घेतली. अनेक ठिकाणी स्वतः चिखल तुडवत पाण्याच्या प्रवाहातून पायी चालत पाहणी केली. तसेच मंगळवारी परळी वैजनाथ तालुक्यातील आणि डोंगर पट्ट्यातील गावोगावी जाऊन भेटी दिल्या, अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी केली. तेथील नागरिक, शेतकऱ्यांना दिलासा दिला. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांसह तरूण, मुलांशीही संवाद साधून नुकसानीची माहिती घेतली. त्यांच्या अडचणी समजून घेतल्या. या पाहणी वेळी देशमुख यांनी अनेकांच्या शेतातील बांध फुटल्यामुळे मोठ्या प्रमाणात माती वाहून गेली आहे. मांजरा, जायकवाडी सारखी मोठी धरणे भरल्याने सतत दरवाजे उघडण्यात आले, अतिवृष्टीमुळे पाझर तलाव व साठवण तलाव भरून फुटले, नद्यांनी पातळी सोडून त्या पात्राबाहेर पडल्यामुळे ते पाणी शेतांमध्ये शिरले.